
अंक २ रा ]

[ वर्ष २६ वें

# " श्री साईलीला "

त्रैमासिक



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

एप्रिल, मे, जून १९५९

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २६ ] त्रैमासिक—एप्रिल, मे, जून १९४९ [ अंक २ रा

# —: संपादकीय :—

**" जगाच्या कल्याणा संतांच्या विभुति ॥ देह कष्टविती उपकारें ॥ "**

आधुनिक कालांत ज्या संतांनी आपला देह झिजवून आपणा सर्वांना कायमचे ऋणी करून ठेवलें आहे, त्या श्रीसद्‌गुरु साईनाथ माऊलीचे, अज्ञ भोळ्या व भाविक लोकांना महत्त्व पटविण्याकरितां '**साईलीला त्रैमासिक**' सुरू झालें आहे. आज नुसता त्यांच्या नामांचा उच्चार केला असतां आलेलें संकट टळून निर्विघ्नपणें कामें होतात व मनाला एकप्रकारचा स्वर्गीय आनंद प्राप्त होतो. अशा तऱ्हेचे अनुभव आपणां बहुतेकांना पदोपदीं येत आहेत.

संत, साधु म्हणजे काय चीज आहे; हें साईबाबांनीं आपल्या आचरणानें सर्व भक्तगणांना दाखवून दिलें आहे. बाबा आज अदृष्य स्थितींत असले तरी त्यांनीं आपणांस भक्तिमार्गानें, संसाररूपी भवसागर तरून जाण्यास खरें मार्गदर्शन केलें आहे व करीत आहेत.

कलियुगांत नाना तऱ्हेचे लोक आहेत त्यांत विशेष अघोरी विद्या संपादन करून, सिद्धींना वश करून लोकांवर छाप पाडून आपलें स्वतःचें स्तोम साईबाबांच्या नांवाखालीं

माजविणारे आहेत. त्यांच्या नादीं लागणें म्हणजे दिव्यावर पतंगानें झडप घालण्यासारखें आहे. 'दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये' आजच्या धकाधकीच्या काळांत लोकांच्या मनांची स्थिति फार केविलवाणी झाली आहे. सामान्य जनता दारिद्र्यानें पिडली आहे. अशा भांबावलेल्या मनःस्थितींतून मार्ग काढण्याकरितां जो तो वाटेल त्या ज्योतिषाकडे, साधूकडे, वैराग्याकडे, जादूटोणा करण्याकडे अगर वाऱ्याकडे ( अंगांत वारें संचार करणें ) धांव मारून असेल नसेल तो पैसा खर्च करून दुःखांत भर टाकीत असतो.

'जे कां रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले ॥ तोची साधु ओळखावा ॥ देव तेथेंची जाणावा ॥' खऱ्या साधूचा दरवाजा पीडितांना सदा मोकळा असतो, नाहींतर अलिकडील साधूंच्या कंपौंडच्या दरवाज्याला भलीं मोठीं कुलपें लागतात. फक्त श्रीमंत लोकांना असल्या साधूंचा दरवाजा मोकळा असतो.

श्री साईबाबांच्या वेळेस हजारो माणसे, लांबलांबचा प्रवास करून शिरडीला, बाबांच्या दर्शनाला येत. व बाबांनीं सर्वांना आशीर्वाद द्यावा, उदी द्यावी, त्यांनीं कधींहि कुलपें घातलीं नाहींत. त्यांच्याकडे गेलेला माणूस कधींही आंबट तोंड करून परत आला नाहीं, उलट हंसत मुखानें गोड तोंड करून घरीं येत. आजसुद्धां गोड अनुभव येत आहेत. बाबांनीं लावलेल्या 'साईफुलांचा' वास जगांत चोहोंबाजूस सारखा दुमदुमत आहे. तो सतत विकसित राहावा व अव्याहत टीकावा म्हणून त्या साईझाडास— ( साईलिलांस ) आपण सर्वांनीं थोडें थोडें पाणी नको कां सिंचन करावयाला ?

गुलाबाच्या फुलाला कांटे असतात, केतकीच्या बुंदांत सापाचें वाटोळें ( वेटोळें ) असतें, चंदनाखालीं सुद्धां नाग डुलत असतो, तसेंच संतांच्या भोंवतींसुद्धां द्वेशी, दुष्ट, कुचाळ निंदक असे दुष्ट वृत्तीचे व अघोरी विद्येला वश करून घेतलेले काळसर्प पुष्कळ असतात. त्यांच्या डोक्यावर पाय ठेवून त्यांना ठेंचून, अविरत व मंदमंद वाहणाऱ्या 'साई फुलाच्या' वासानें मोहित होणाऱ्या भोळ्या भाविक जनांना धीर द्यावयाला नको का ?

नरदेहाची प्राप्ती एकदांच होते. त्याचा उपयोग चांगल्याप्रकारें झाला नाहीं तर जन्मदात्या प्रभूला काय वाटेल ! त्याकरितां खऱ्या साधूची, संताची, सत्पुरुषाची, आपल्याला गरज असते, कारण ते स्वतः अनुभवानें सिद्ध असतात. नुसती पोथ्या—पुराणें, शास्त्र अगर धार्मिक ग्रंथ वाचून फक्त शाब्दिक अर्थ समजेल, पण खरें मर्म किंवा रहस्य खऱ्या मार्गदर्शकावांचून ( सद्गुरु ) समजणार नाहीं.

कोणी एक श्रीमान गृहस्थ होता, त्याच्या मनांत असें आलें कीं, आपतकालीं अगर माझ्या पश्चात् संततीला उपयोगी पडावें म्हणून कांहीं द्रव्य आपण गुप्त ठिकाणीं दडवून ठवावें, त्याप्रमाणें त्यानें आपल्या स्वतःच्या मालकीच्या सिद्धेश्वराच्या देवळाच्या शिखरावरील घुमटाच्या पोकळींत कोणाच्याहि दृष्टीस पडणार नाहीं अशा ठिकाणीं पुष्कळ द्रव्य नेऊन ठेवलें; व त्या संबंधानें एका निराळ्या वहींत नोंद करून ठेवली.

' संवत १७२५ व्या वर्षी उत्तरायणांत चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षांतील अष्टमीस दिवसा १२ वाजतां सिद्धेश्वराच्या देवळाच्या शिखरावरील घुमटांत (१५) पंधरा लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरा ठेवल्या आहेत. जेव्हां काम लागेल तेव्हां त्या काढाव्या ' व ती वही गुप्त ठिकाणीं ठेवली. पुढें बऱ्याच वर्षांनीं तो गृहस्थ आपल्या परिवारासह यात्रा करण्यास निघाला. प्रवासांत असतांना कॉलिराची साथ ( फटकी ) उद्भवली व त्यांत तो सांपडून मरण पावला. कलांतरानें त्याचा मुलगा मोठा झाला. व बापाच्या धंद्याकडे लक्ष घालूं लागला. त्या धंद्यांत त्याला वारंवार खोट खावी लागे, धंदा नुकसानींत असल्यामुळें तो कर्जबाजारी झाला. त्याचे धनको आपल्या पैशाची मागणी करून त्यास दुःख देऊं लागले. एके दिवशीं तो बापाच्या चोपड्या तपासीत असतां ती गुप्त ठेवलेली वही त्याच्या हाताशीं लागली, त्यांतील मजकूर वाचून त्याला अत्यंत आनंद झाला, लगेच त्यानें गवंडी वगैरे आणून तो घुमट खाली उतरविला; परंतु तपासा अंतीं त्यांत कांहींच सांपडलें नाहीं. म्हणून ती वही त्यानें खिन्न मनानें परत वाचली, व आपल्या दोनतीन मित्रांना पण दाखविली.

' देवळाच्या शिखराच्या घुमटांत धन ठेवलें आहे ' असाच सर्वांनीं निष्कर्ष काढला, व ज्यानें त्यानें आपल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणें अर्थ लावण्यास सुरवात केली कोणी म्हणावें हीं रक्कम खोटी खर्चीं घातली असावी, तर कोणी म्हणावें सोन्याच्या मोहरा कोणापासून तरी विकत घेतल्या असतील आणि त्या रकमेइतकी रक्कम कोणत्या खात्यास खर्चीं घातली असावी, शंका कुशंका अनेकांच्या अनेक निघाल्या, एकानें म्हणावें त्या चोपड्या नीट वाचल्या नाहींस, नीट वाचून प्रहा ! वगैरे वगैरे. आपला बाप असें खोटें कृत्य कदापि करणार नाहीं.

आपल्याला त्याचा अर्थ होत नाहीं हेंच खरें; असें मनीं धरून तो एका वृद्ध नातेवाईकाकडे गेला व आजोबा ह्या चोपडींत लिहिल्याप्रमाणें देवळाचा घुमट मी द्रव्यासाठीं उतरवला व सर्व लोकांत, बापानें देऊळ बांधवलें व चिरंजीव शहाणे निघाले त्यांनीं तें फोडून टाकलें. असा माझ्यासंबंधीं दुर्लौकिक पसरला आहे. त्यामुळें मला अतिशय वाईट वाटत आहे तरी मला ह्यांतून वांचवा. बुद्धिमान वृद्ध मनुष्याच्या मनांत दया उत्पन्न झाली आणि तो म्हणाला, ' अरे बाळा, तूं कांहीं काळजी करूं नकोस. तुझ्या वहींत जें कांहीं लिहून ठेवलेलें आहे तें सर्व खरें आहे व त्याप्रमाणें तुला द्रव्य मिळेल. पण दरम्यान तूं हा घुमट अगोदर पूर्वींप्रमाणें बांधून तयार कर. त्याला खर्चाला लागणारा पैसा माझ्याकडून घेऊन जा आणि तो तयार झाल्यावर चैत्र शुद्ध ८ मीच्या दिवशीं सकाळीं मला येऊन भेट. त्याप्रमाणें तो घुमट पूर्ववत बांधून तयार केला.

चैत्र शुद्ध ८ मीच्या दिवशीं तो बुद्धिमान वृद्ध गृहस्थ आला व दुपारीं १२ वाजण्याच्या सुमारास म्हणाला कीं, ' चल आपण बागेंत जाऊन सिद्धेश्वराचें दर्शन घेऊं ' त्याप्रमाणें दोघांनीं महादेवाचें दर्शन घेतलें व महादेवास प्रदक्षिणा घालीत असतां त्या घुमटाची छाया खालीं जमिनीवर पडली होती ती आजोबांनीं मुलास दाखवून म्हटलें, ' बाळा, देवळाचा घुमट याला म्हणतात ' तर मग ही जागा खण. त्याप्रमाणें ती जागा

खणली तों त्यांत १५ लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरा दृष्टीस पडल्या. तात्पर्य काय कीं, ज्यावेळीं लिहिणाराचा अभिप्राय बरोबर रीतीनें समजणारा बुद्धिमान मनुष्य त्या मुलास मिळाला तेव्हांच त्याला द्रव्याची प्राप्ति झाली. **तद्वत् देहरूप घुमटांत सच्चिदानंद आत्मस्वरूप द्रव्य आहे व त्याची नोंद श्रुतिस्मृति शास्त्ररूप वहीत करूनही ठेविली आहे; असें जरी खरें आहे तरी अनुभवानें सिद्ध झालेल्या सद्गुरूच्या द्वारें शास्त्राच रहस्य समजावून घेतल्याशिवाय आत्मस्वरूप धनाची प्राप्ति कदापीहि होणार नाहीं.**

जो स्वधर्माचा त्याग करीत नाहीं, ज्याच्या ठायीं सदा सर्वदा समदृष्टी, वैराग्य, शांति, दांति, धैर्य, दया, अदंभ, अमान, अक्रोध, क्षमा, अद्वेष शुचित्त्व इत्यादि शुभगुण वेदार्थ जाणणारा व ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं निष्ठा धारण करणारा. साधू, सद्गुरु व सत्पुरुष होय. माझ्या पाहाण्यांत फक्त श्रीसद्गुरु साईबाबा आहेत व त्यांचें शिष्यत्त्व आमच्यासारख्या सामान्य माणसाला घेणें योग्य होईल काय ?

श्री साईबाबांनीं आपल्यामागें शिष्यपरंपरा केली नाहीं. त्यांनीं कोणालाहि मंत्रतंत्र दिले नाहींत तर आपल्या आचरणानें सर्वांना भोळी भावडी भक्ति शिकवली. आज मितीस त्यांचे शिष्य म्हणून जो तो मिरवतो; पण तें निव्वळ थोतांड आहे. कारण आम्ही सर्व त्यांचे भक्त आहोंत. शिष्य नाहींत.

वाटेल त्या भूल थापांना बळी पडूं नका. श्रीसाई बाबा—साईलीला—परमात्मा समजून प्रत्येकानें भक्तिभावानें आकळून आपलासा करून घ्यावा. अशारीतीनें एकनिष्ठेनें, सबुरी व श्रद्धा ठेवून श्रीबाबांची सेवा केली तर तुम्हाला त्यांच्या सान्निध्याचे गोड गोड अनुभब चाखावयास मिळतील. अशा रीतीचे आलेले अनुभव आपण साईलीलेंत प्रसिद्ध करून आपल्या बांधवांना सद्गुरुमाऊलीच्या प्रभावाचें महत्त्व पटवून द्या. हीच या अज्ञ संपादकाची आपल्या सर्वांच्या चरणीं नम्र विनंति आहे.

**संपादक.**

## ॥ श्रीसद्गुरु साईनाथ स्तोत्र ॥

नं. १

नमो साइनाथं शिवं शान्त रूपम् । सदा सर्वसिद्धि प्रदातृ स्वरूपम् ॥
विभूतिः सताम् कालशक्ति स्वरूपम् । नमस्ते जगत्तारणं श्रीसाइनाथम् ॥ १ ॥
नमस्ते शिवं सानुकम्पम् शरण्यम् । नमस्ते जगद्व्यापकं साइनाथम् ॥
नमस्ते जगद्वंद्य पादारविंदम् । नमस्ते जगत्तारणं श्रीसाइनाथम् ॥ २ ॥
नमस्ते जगच्चिन्त्य मानस्वरूपम् । नमस्ते महायोग विज्ञानरूपम् ॥
नमस्ते नमस्ते महानन्द रूपम् । नमस्ते जगत्तारणं श्रीसाइनाथम् ॥ ३ ॥
अनाथस्य दीनस्य तृष्णा तुरस्य । भयार्तस्य भीतस्य बद्धस्य जंतोः ॥
त्वमेकं शरण्यं वरेण्यं प्रपद्ये । नमस्ते सदानन्द श्रीसाइनाथम् ॥ ४ ॥
विपत्तौ गृहे दारुणे शत्रुमध्ये । जले संकटे राजगेहे प्रवासे ॥
सदाभक्त रक्षार्थ सज्जं सुनित्यम् । श्रीसाइनाथं शरणं प्रपद्ये ॥ ५ ॥

अपारे महादुस्त रत्यन्तघोरे । निपत्सागरे मज्जतां देहभाजां ॥
त्वमेका गतिर्देव भक्तानुकम्पम् । नमस्ते जगत्तारणं श्रीसाइनाथाम् ॥ ६ ॥
नमो साइनाथं परब्रह्म रूपम् । नमो साइनाथं जगत्राण हेतुम् ॥
अपार संसार समुद्रमध्यें । मांपातु साई कृपया कटाक्षम् ॥ ७ ॥
नमस्ते प्रभो क्षेमकल्याण रूपम् । गृहीतानुकम्पा दया हेतु रूपम् ॥
सदाभक्त कार्यार्थ मनुर्देह धारीं । श्री साइनाथं शरणं प्रपद्ये ॥ ८ ॥

पद्मनाभ कृतम् स्तोत्रं, आपदुद्धार मष्टकम् ॥
त्रिसंध्यं एक संध्यंवा, पठना देव संकटात् ॥
मुच्यते नात्र संदेहो, भुविस्वर्गे महीतले ॥
साइनाथ कृपा शक्त्या, भक्त श्रेष्ठो भविष्यति ॥ ९ ॥
[ इति श्रीसाइनाथ स्तोत्रं श्रीसाइनाथार्पणमस्तु ]

**पंडीत पद्मनाभ पालये शास्त्री**
कृत.
दादर.

## ॥ श्रीसद्गुरु साईबाबांचे स्तोत्र ॥
नं. २

ॐ नमो भगवते परब्रह्म स्वरूपिणे । सच्चिदानंद रूपाय, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥ १ ॥
ॐ नमो श्रीसद्गुरु परब्रह्म साइनाथम् । अखण्डं निर्गुणं वन्दे, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥२॥
सुरेशं वंदितं देवं पूर्णब्रह्म सनातनम् । हरिहरात्मकं दिव्यं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥ ३ ॥
भूतेशं ब्रह्मलोकेशं शुभ्र कौपीन धारिणम् । शिलाखण्ड स्थितं ब्रह्मं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥४॥
निर्मलं शामवर्णं च सुन्दरं भाल शोभितम् । सुलोचनं विशालाक्षं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥५॥
शुभ्र रोमांकितं शीर्षं पट्टदूकूल ग्रंथिभिः । मण्डितं मस्तकं शान्तं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥ ६ ॥
शान्तं स्वानंद स्वरूपम् धूम्रवन्हि समायुतम् । प्रसन्न वदनं श्रीशं, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥ ७ ॥
सदायोगी सदात्यागी बाललीला पिशाचवत् । क्रोध कृपा विरोधेण, भक्ताभिष्ट फलप्रद ॥ ८ ॥
संसारदुःख निमग्नानां आर्तानां सुखदायकम् । लीला विग्रह रूपाय, श्रीसाइनाथ नमोस्तुते ॥९॥
इदं स्तोमं महद्दिव्यं सर्वरक्षा करं नृणां । आधिव्याधि हरं श्रेष्ठं, इष्ट सिद्धि प्रदायकम् ॥ १० ॥
त्रिकालमेक कालं वा पठनं सर्व साधकम् । पद्मनाभ कृतं स्तोत्रं, श्रीसाइनाथ समर्पितम् ॥ ११ ॥

श्रुत्वा स्तोत्रं साइनाथं प्रसन्नं वरदायिनम् ।
योमां स्तौति नित्यं भक्ति श्रद्धा समन्वितम् ॥
तस्य सर्व कार्याणि सिद्धिर्भषतिं न संशयः ॥ १२ ॥
[ इति श्री साइनाथ स्तोत्रं श्री साइनाथार्पणमस्तु ]

**पंडीत पद्मनाभ पालये शास्त्री**
कृत.
दादर.

# ' प्रासादिक भजन '

## नाम

(१)

नाम तुझें बहु गोड ॥ साई ॥
देई चरणाची जोड ॥ साई ॥
' मरा ' म्हणतां ' राम ' प्रगटला ।
रामायण तो लिहिता झाला ।
वाल्या कोळी वाल्मीकी झाला ।
प्रभाव नामाचा वाढविला ।
दे नामाची मोट ॥ साई ॥
नाम मात्रा प्रातःकाळीं ।
उठतां बसतां निजतां घ्यावी ।
अहर्नीश ती संनिध ठेवी ।
शांकिणी डांकिणी दूर पळवी ।
नाम गांठ ती सोड ॥ साई ॥
नामें तरिती तुकया गाथा ।
नामाच्या त्या अगाध वार्ता ।
दास केशव काय वर्णीता ।
घ्या नामाची झोड ॥ साई ॥

## रुपक

(२)

नयम मनोहर सगुण साजिरी मूर्ती विटेवरी ।
पुंडलिकें उभी केली । चंद्रेच्या तीरीं ॥ १ ॥
कांळि सांवळि पाषाणाची । मूर्ती सूंदर ।
भावा पोटीं भासे भक्तां । सजीव साकार ॥ २ ॥
कृष्ण सांवळा रमामाधव । रुक्मीणीपती ।
तिष्ठत उभा पंढरपूरी । भक्तांच्यासाठीं ॥ ३ ॥
पाषाणाची मूर्ती गोजिरी । मानूं नका हृदयीं ।
आत्मभावानें पहा । कशी दिसे नयनीं ॥ ४ ॥

जळीं स्थळीं पाषाणीं भरला । उरला तो देव
रिता ठाव आहे कोठें । पुसे केशव ॥ ५ ॥

( ३ )

साई तुझें रूप । दिसों दे नयनीं ।
उमटो भाव मनीं । सर्व काळ ॥
गोरें गोरें पान । सुंदर मोहक
पाहूं दे तें मूख । सदोदित ॥
नाक कान ओंठ । गुलाबी ते गाल ।
मिशा दाढी बाल । शुभ्र असे ।
नयन मनोहर । भालीं चंद्राकार ।
गंध तें झळाळे । केशराचें ॥
बांधुनीया फडका । स्वच्छ शुभ्र डोई ।
शोभे तो मुगूट । साई शिरीं ॥
फडक्याचा आंबाडा । रुळे पाठीवरी ।
ज्ञानाची मोटली । परी असे ॥
अज्ञान जाळूनी । ज्ञान धूर सोडी ।
तमाखू चिलीम । ओढूनियां ॥
ज्ञानामृतें भरली । काळी ती चिलीम ।
हातीं देई मग । अज्ञ जनां ॥
दया क्षमा शांती । नांदे तव नयनीं ।
प्रेमें मजकडे । पाहीं जरा ॥
सदा सर्वकाळ । हांसत मुखानें ।
माझ्या संगे बोल । कांहीं तरी ॥
गोजीरे गोमटें । हेंची तुझें रूप
केशवा लोचनीं । सदा राहो ॥

( ४ )

सुंदर तें रूप बसें मिशिदींत ।
कठड्यावरी कर ठेवूनीयां ।
शुभ्र कफनी अंगी डोईस फडका ।
ध्यान हेंची हृदयीं धरी आतां ।

चिलीम सटका नित्य असे जवळी ।
चंद्रकोर भाली गंध असे ।
हेंची माझें सूख म्हणे केशव ।
साई - मुख बवे आवडीनें ।

( ५ )

सगुण गोजीरें साईचें रूपडें ।
पाहुनीया मन सुखावले ।
नको जाऊं दूर राहे दृष्टीपुढें ।
घेऊं दे ते सूख अंतरंगीं ।
रंगोनी राहीलों लागलीसे गोडी ।
ध्यानीं मनीं साई-रूप जोडी ।
बाबा तुझ्याकडे मागावें लडीवाळें ।
पुरवी दास केशवा साई तूं प्रेमळें ।

## माहिमा,

( ६ )

अगाध लीला अघटित करणी । सद्गुरू साईची ॥ १
किती महिमा वर्णूं मी पामर । शब्द नच सुचती ॥ २
स्वप्नांमध्यें जाऊनी भक्ता । दृष्टांत देई ॥ ३
काळाच्या जबड्यांतूनी पोरा । घेऊनी तो येई ॥ ४
गरिबाचा वाली दयाळू । मुलला भक्तीला ॥ ५
धांवुनी आला हांकेसरसी । संकट समयाला ॥ ६
भाऊबंद आप्त स्वकीय । जमती पैशाला ॥ ७
निर्वाणीचा एक सखा तूं । धांवसी हांकेला ॥ ८
धरा धरा तुम्ही साईचरण । खरा मायबाप ॥ ९
देयील सौख्य हरण करूनी । त्रिविध त्रीताप ॥१०॥
निष्ठा ठेवुनी सबुरी राखा । दृढ करा मन ॥ ११ ॥
एक सांईला केशव विनवी । करा अर्पण ॥ १२ ॥

## ( ७ ) दांभिक-भक्त

कशासी जातां दूर । इथेच पढंरपूर ॥ धृ० ॥
पाषाणाची मूर्ती मानी ।

अनुभव नाहीं जनीं मनीं ।
टाळ पताका अर्थची कांहीं ।
वारीचा तो समजत नाहीं ।
जाऊं नका तुम्हीं दूर । इथेच पढंरपूर ॥ १ ॥
एकादशीचा उपास करूनीं ।
शिव्या श्राप तो मुखांतूनीं ।
बोले टोंचुनी वर्मे काढूनी ।
आहार निद्रा भय मैथूनी ।
प्रेम असें तें सदा मन्मनी ।
नका जाऊं हो दूर । इथेंच पंढरपूर ॥ २ ॥
भक्तिचा लवलेशही नाहीं ।
भाव काय तो ठाऊक नाहीं ।
नामाचा उच्चारही नाहीं ।
आई बाप तो मानित नाहीं ।
चैन मनाची सुटतच नाहीं ।
माझे माझे करीतच राही ।
असे कसे तुम्हीं क्रूर । कशासी जातां दूर ॥ ३ ॥
देवाच्या नांवाला बट्टा ।
लावूनी करितां तुम्ही सट्टा ।
विकूनी त्याला करितां गठ्ठा ।
धनाचा, जमिनीचा पट्टा ।
फसवणुकीच्या बारा वाटा ।
शोधून काढून करी लटपटा ।
असे तुम्ही हो शूर । नका जाऊं तुम्ही दूर ॥ ४ ॥
मुद्रा टीळा ठसे उमटुनी ।
अबीर बुका त्यांत मिसळुनी ।
तुळशी माळा गळां घालुनी ।
आषाढी कार्तिकी वारी करूनी ।
दमले शिणले ये जाऊनी ।
परि विठ्ठल नुमजे मनीं ।

व्यर्थ पायपीट हवी कशाला ।
नका जाऊं तुम्ही दूर । इथेच पंढरपूर ॥ ५ ॥
एक मनाने पुजा करूनी ।
ध्यान धारणा येई साधुनी ।
संगत संतांची ती धरूनी ।
अज्ञानाची होळी करूनी ]
ज्ञानरसाचा धूर पीऊनी ।
सत्-हृदयांच्या तारांतूनी ।
निघेल आत्मसूर । इथेच पढंरपूर ॥ ६ ॥
देव निजला हृदयीं-शयनीं ।
करावा जागा निद्रेतूनी ।
दश इंद्रियांच्या मेळा मिळुनी ।
टाळ सुरांची लय साधूनी ।
नाम गजरांच्या नादांतूनी ।
ब्रह्मानंदी लागेल वर्णी ।
धांवत येऊनी ठाके नयनीं ।
आला नयन-चंद्रेला पूर । इथेच पढंरपूर ॥ ७ ॥
साईचा ध्या ध्यास लावूनीं ।
साई साई म्हणत राहूनी ।
साधा साईच्या सूरांनी ।
ब्रह्मानंदी मिळेल जाऊनी ।
जागा होऊनी त्या नादांनी ।
धांवत एईल हृदयांतूनी ।
केशव सांगे नाही जात मी दूर । माझे इथेच पढंरपूर ॥ ८ ॥

## ( ८ ) भीक

जनीं वनीं ध्यानीं मनीं । राहो तुझे रूप ॥
लागो भूक साई देवा । तुझी सदोदित ॥
तृष्णा तुझी लागो अम्हां । गंगेचे उदक ॥
लागो समाधान आतां । हारूनीयां दुःख ॥

किर्ति तुझी ठाऊक आम्हां । आहे तूं उदार ।
घाली कृपेची ती भीक । नको जाऊं दूर ।
पतीत पावन असती ! । दई हेंची सूख ।
दास केशवाची आण । धरी तुझे पाय ।

(९)

भिकारी होवोनीयां । आलों तुझ्या दारीं ।
अनाथाचा नाथ म्हणशी ! । लोटूं नको दूरी ॥
दया क्षमा शांती मेरू । कृपेचे आगरू ।
कोणाकडे जाऊं सांग । मी तुझें लेकरूं ।
जगन्मिथ्या ब्रम्हसत्य । नाहीं अनुभव ।
माया रांड लागे पाठीं । तारी तूं माधव ।
चारी बाजू मागे पुढें । राहीबा अनंता ।
नाहीं मग केशवासी । कशाची ही चिंता ।

## (१०) दळण—जातें.

दळुं ग बाई दळूं । ग सारे बाई दळूं ॥ धृ० ॥
वैराग्याचा खुंटा धरूनी । ओढूनी ओढूनी दळूं ।
हृदयपटावरी चटई घालूं ।
ज्ञान-भक्तिचें जातें मांडू ।
सत्-भावाच्या जोडीनें ते दळूं ॥ १ ॥
सत्व रजतम धान्यें घालूं ।
सात्विक शुद्ध पीठ पाडूं ।
दाणें षड्रिपू वैरण वैरूं ।
भरडुनी भरडुनि दळूं ॥ २ ॥
सत्भावाचें पीठ देऊं ।
जेवूं मग देहाला घालूं ।
भाग्याची भाकरी खाऊनी ।
अहंकार तो दळूं । ग बाई सारे दळुं ॥ २ ॥
महा मारी हांकीं साई ।
दळूनि जात्यांत गहूं ।
केशव सांगे घट्ट धरूनी ।
किती साई कळकळू ॥

## ११ फुगडी

फूं बाई फूं । खेळुं फूगडी ॥ धृ० ॥
नको जाऊं तूं बाई आपुली जोडी ॥ १ ॥
जाऊं दे मला बाई आतांच्या घडी ।
नाहीं तर घरीं माझ्या होयी फूगडी ॥ २ ॥
पती जोडी पत्नी ओढती गाडी ।
ताटाबूट संसाराची हीच फूगडी ॥ ३ ॥
स्त्रियांना देव पती दुसरा न जोडी ।
फूं करूं नको गडीं राही उघडी ॥ ४ ॥
पतीविना संसारीं नाहीं ग गोडी ।
उडी घे संसारांत खेळ फूगडी ॥ ५ ॥
गोपगोपी सह कृष्ण खेळे फूगडी ।
प्रेम–रज्जु बांधीं कृष्णा भक्ती रोकडी ॥ ६ ॥
कृष्णसाई पती माझा खेळूं फूगडी ।
प्रपंच परमार्थी जोडीन गडीं ॥ ७ ॥
पतीजोडा पतिव्रतांनो हाची सौंगडी ।
केशव सांगे अर्पुन त्याला सर्वस्वी कोडी ॥ ८ ॥

———×———

काला फुगडी घाली संत देवाच्या पुढें ।
संसाराची फुगडी नको म्हणून गडे ॥ १ ॥

( १२ )

## काला.

साईबाबा करिता काला ।
मटण भात भाजीपाला ॥ १ ॥
एके ठायीं करूनी अन्न ।
भक्तांसह करीं भोजन ॥ २ ॥
केशवासी नाहीं मान ।
लुटीतसे साई – धन ॥ ३ ॥

## ( १३ )
## उपदेश

श्रीमंताचे घर त्वेजीं आगोदर ।
घरीं बैसोनीयां उपाशीं मरावे ॥ १ ॥
बसल्या बसल्या घरीं मुखें म्हणा हरी ।
नको जाऊं दूरी भोंदूकडे ॥ २ ॥
मानी समाधान आहे त्या स्थितींत ।
करूं नको द्वेष दुसऱ्याचा ॥ ३ ॥
धरीं शुद्धभाव अतंरी निर्मळ ।
परदारा जाण मातेसम ॥ ४ ॥
असत्य भाषण बेतली प्राणांती ।
करूं नये आण श्री साईची ॥ ५ ॥
करा उपकार परसुखासाठीं ।
धरूं नको पोटी मोह माळ ॥ ६ ॥
केशव म्हणे कृपावंत साई ।
तेथें दृढ भाव असूं द्यावा ॥ ७ ॥

## १४ धांवा

संसार सागरांत बुडलो कोण मला तारी ।
तुजविण देवा साईबाबा येई तूं लवकरी ।
अंत नको पाहूं सदया हात देई झडकरी ।
निर्वाणीचा एक सखा तूं धांवत ये लवकरी ।
**अनंत कोटी ब्रह्मांडनायक** असती तूं साई ।
राजाधीराज म्हणती तुला रे, धांव झणीं येई ।
शिणलों पिडलों व्याधी ज्वरानें मती गुंग झाली ।
धांवत येऊनी हात कृपेचा ठेवी मम भालीं ।
श्वास लागला कोरड पडली हृदय धडधडते ।
शरण येऊनी केशव म्हणे धरी जीवातें ।

—संपादक

—— x ——

**संपादक महाशय साईलीला,**

श्री साईच्याच प्रेरणेनें खालील आरती केली आहे ती आपणांस योग्य दिसल्यास साईलीलेंत छापावी.

## आरती.

आरती साईनाथा । महासंता अनंता ॥
सेविती भक्त गण । नम्र करोनि माथा ॥ १ ॥
संसार सागरांत । दुःखें येती अनंत ॥
तारण्या साईनांव । नाम घेई सतत ॥ २ ॥
पतित मी दुराचारी । मज कोण उद्धरी ॥ !
तुम्हांविण साईनाथा । नच कोणी समर्था ॥ ३ ॥

**पद** ( चालः– चंद्रकांत राजाची. )

प्रभातकाळीं उठुनि सकाळीं गावा हा साई ।
भवभय हारक नाम प्रभुचें ध्यावें लवलाही ॥ १ ॥
अवनी अवघी व्यापुनि उरला कळे सर्व त्याला ।
समधिस्थ जो असुनी भक्ता धांवे हांकेला ॥ २ ॥
पाप ताप आणि अवघी चिंता नाम लया नेई ॥
धीर गंभिर आणि दयाळू साई मूर्ती पाही ॥ ३ ॥
कल्पवृक्ष तुज जवळी असतां खिन्न असा तूं कां ।
भाव धरोनी माग मागणें धरूं नको शंका ॥ ४ ॥

आपला दास
**यमुना सूत**
दादर–मुंबई

---

## ‘ साई–प्रभाव ’

### १

माझा जन्म वैशाख शु. ५ मी १९०६ सालीं झाला. वयाच्या ७ व्या वर्षी मी आजारी झालों–म्हणजे इ. स. १९१२ सालीं. मोठमोठे डॉक्टर झाले, वैद्य झाले, नाकाडोळ्याचे वैदू झाले. जीवदानीला नवस केले. जेवढे करण्यासारखे होते तेवढे सर्व उपाय केले. परंतु गुण नाहीं. जवळ जवळ दोन महिने मी बेशुद्ध स्थितींत बिछान्याला खिळून होतों. मुंबईचे मोठे डॉक्टर आणले, त्यांनीं माझी प्रकृति तपासली, व

आपलें निदान ठरवून ऑपरेशन केल्याशिवाय हा बरा होणार नाहीं. असा निर्णय दिला. १९१२ सालीं ऑपरेशन म्हटल्यावर आपल्या प्रियजनांची काय स्थिती होत असे हें आज सांगून पटण्यासारखें नाहीं. घरांतील मंडळीनें ऑपरेशन करून आपण स्वतः मारण्यापेक्षां इथेंच ठेवून काय होईल तें पाहाण्याची जणूं काय प्रतिज्ञाच केली म्हटल्यास अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं.

कै० रावसाहेब यशवंत जनार्दन गाळवणकर ट्रस्टी, शिरडी संस्थान कमिटी, हे आपल्या श्वशुराबरोबर, कै० दाभोळकर–श्री. साई सत् चरित्राचे लेखक–"हेमाडपंत"– शिरडी मुक्कामीं जाऊन आले होते. त्यांनीं येतांना साईबाबांचा एक फोटो व उदी आणली होती. त्यांचें घर आमच्या घराजवळच आहे. व ते आमच्या काकांचे परम स्नेही होते. ते घरीं आले. आणि म्हणाले, "विठ्ठल अरे हा फोटो आणला आहे. आणि ही उदी आणली आहे. हिचा उपयोग तूं मधुवर (मला मधू म्हणत) कर. आणि साईबाबांना सांकडें घाल." रावसाहेब गाळवणकर हे विद्वान तसेंच भक्तिमार्गांत फार पुढें गेले होते. व त्यांच्याकडे सर्व अनोळकर प्रेम दृष्टीनें पहात असत, काकांना आतां दुसरा मार्गच शिल्लक नव्हता. त्यांनीं तो फोटो पूजेस लावला, पुजा करून उठले, माझ्या तोंडांत तीर्थ घातलें, व श्री बाबांचीं उदी कपाळाला लावली; व हा बरा झाला म्हणजे शिरडी मुक्कामीं ह्याला आपल्या पायांकडे पांच शेर पेढे घेऊन पाठवीन असा नवस केला. मला शुद्ध नव्हती व अंगांत ताप असल्या कारणानें बेचैन होतों.

माझी आत्या, तिचा माझ्यावर फारच लोभ व मी शुद्धीवर असतांना तिचा मला फार लळा असल्या कारणानें आईपेक्षां तिच्याकडेच मी झोंपत असें. ती मला मांडीवर घेऊन दिवसरात्र बसून राही. ज्या दिवशीं सकाळीं मला माझ्या काकांनीं (विठ्ठल बळवंत गव्हाणकर) उदी लावली त्याच मध्यरात्रीं गं. भा. आत्याला स्वप्न पडलें— सद्गुरु साईबाबा स्वतः आले–जसे फोटोंत पाहिले–तसें–व एक नारळ मागून घेतला, माझ्या अंगावरून ओंवाळून माजघरांतून ओटीवरच्या दारानें निघून गेले. व जातांना "अच्छा अच्छा करेंगे" असें म्हणाले. माझी आत्या धडपडत उठली व घाबऱ्या घाबऱ्यानेंच अंगाला हात लावला.) तो अंग थंडगार. लगेच काकांना हांक मारली! काका धांवतच आले. त्यांनीं पाहिलें तों ते सुद्धां घाबरलेल्या स्थितींत असल्यामुळें त्यांच्या हाताला नाडी लागली नाहीं. झालें कारभार आटोपला! म्हणून सगळीकडे रडारड सुरू झाली. इतक्यांत डॉ. दीनकर जगन्नाथ गाळवणकर वर माडीवर झोपले होते ते ताबडतोब खालीं आले. व शांत समाधानानें नाडी पाहूं लागले, तों नाडी व्यवस्थित चालली आहे. त्यांनीं सर्वांना सांगितलें कीं, अरे तुम्ही रडतां कां? मधु चांगला आहे. सर्वांनीं माझ्याकडे पाहिलें. तो मी शांतपणें झोपलों आहे व श्वासोश्वास सुद्धां व्यवस्थित चालला आहे. ताप उतरला ९८° अंशापर्यंत आला व सकाळीं मी शुद्धीवर येऊन सर्व मंडळींना ओळखूं लागलों. त्या दिवसापासून मला आराम पडला व मी बरा झालों.

पुढें १९१६ सालीं माझ्या आते बहिणीचा पहिला मुलगा एक वर्षाचा होता. त्याला जमिनीवर ठेवला असतां डोकें व पायाची खोट (टांच) जवळ जवळ येत असत व धनुष्याकृति होत असे. त्याला घेऊन माझी आते बहिण, आत्या, धाकटे काका, (रामचंद्र) इत्यादि शिरडीला जाण्यास निघाले. त्या वेळेस, मी मराठी पांचव्या इयत्तेंत होतों. माझा नवस असल्यामुळें मला सुद्धां घेऊन गेले.

आम्ही बोरीबंदरावर (व्ही. टी. ला) गाडींत बसून मनमाड दौंडवरून सकाळीं सहा वाजतां कोपरगांव स्टेशनवर आलों. दिवस थंडींचे असल्यामुळें थंडींत जवळ जवळ गारठूनच गेलों होतों. त्या वेळेस मोटार बस वगैरे नसल्यामुळें टांगे करूनच शिरडीस जाणें भाग पडे, आम्हीं टांगा केला वाटेंत गोदावरीचें विस्तीर्ण पात्र लागतें तें ओलांडून पलीकडे गेलों. व शिरडी मुक्कामीं जवळजवळ नऊ ९ वाजतां पोहोचलों.

त्या वेळीं शिरडीला फक्त दिक्षितवाडा (भोजनालय), साठे यांचा वाडा (गुरु पादुका निंबवृक्ष), मशिद (द्वारकामाई), चावडी, सगुण मेरू नाईक यांची खाणावळ. आम्ही टांग्यांतून उतरलों व दिक्षित वाड्यांत गेलों. तोंच माधवराव देशपांडे आम्हांला म्हणाले. कीं, द्वारकामाईत चला—जेथें हल्लीं समाधी आहे, त्या बुटीवाड्याचें काम सुरू होतें. तेथून मशिद माईपर्यंत दाट जाईजुईनीं आच्छादलेल्या कमानी होत्या—हल्लीं आहेत—त्या सुंदर नयनमनोहर आर्चे मधून आम्ही मशिदींत आलों. भव्य मंडप पाहून व दुतर्फा लोकांची गर्दी शिस्तींत बसलेली पाहून मनाला फारच समाधान वाटलें आणि पायऱ्या चढून वर गेलों. तों एक भव्य नयनमनोहर, आल्हाददायी, पायघोळ शुभ्र कफनी व शुभ्र डोकीला फडका गुंडाळलेली श्री साईंची मूर्ति, कटड्यावर एक हात टेकून, दोन्ही पाय लांब सोडून बसलेली पाहिली. श्री बाबांच्या डाव्या बाजूला खांबाला टेकून व मान खालीं घालून डावा पाय एकमनानें चेपीत (मर्दन करणें) बसलेले श्रीमंत नवकोट नारायण बुटी बसले होते. व दुसऱ्या बाजूस माधवराव (शाम्या) देशपांडे, काकासाहेब दिक्षित व पुरंदरे काका, भाऊसाहेब धुमाळ, वगैरे मंडळी पाय चेपीत बसलेले आढळले आणि वरती जाऊन जिथें भिंतीला समोर हल्लीं हार घालतात— त्याला निंबार म्हणतात— त्या जागीं जाऊन बसलों. दोन क्षण गेले नसतील. तोंच मला हांक मारली, पहिल्या प्रथम आम्हांला बोध झाला नाहीं. मग माधवराव देशपांडे यांनीं मला बोलविलें! व मी बाबांजवळ भीत भीतच गेलों. बाबांनीं माझा हात धरला आणि म्हणाले, "माझे पेढे कुठें आहेत." माझ्या काकांनीं पांच शेर पेढ्यांचा लहान करंडा माझ्या जवळ दिला तो मीं बाबांच्या हवाली केला. व उभा राहिलों. मी घाबरलेल्याच स्थितींतच होतों. बाबांनीं पेढ्यांकडे बघितलें. आणि माझा हात धरून, एकदम मला जवळ ओढलें. व आपण स्वतः पेढे खाऊं लागले. माझ्या हातावर पांच पेढे ठेवून खाण्यास सांगितलें. ते मीं खाल्ले व बाबांनीं बाकीचे खाऊन फस्त केले.

माधवराव देशपांड्यांनीं बाबांना विचारलें, देवा समदेच्या समदे पेढे खाल्ले [‘माधवराव बाबांना देवा म्हणून हांक मारीत व बाबा त्यांना शाम्या म्हणून हाक मारीत,

व त्यांच्यात अरे तुरेची रांगडी भाषा चाले.] बाबांची बोली आपल्यासारख्या प्रथमच जाणाऱ्याला लवकर समजत उमजत नसे—बाबा म्हणाले, "अरे शाम्या ह्या पोरांनीं मला पांच वर्षें उपाशी ठेवलेंरे. अरे लय भूक लागली होती पोराची" असें म्हणून स्तब्ध राहिले. मी त्यांच्या कुशींतच बसलों होतों.

श्री साईबाबा बसले होते. हल्लीं त्या जागीं जरा बाजूला, सिंहासनावर फोटो आहे—त्यांच्यासमोर धुनी पेटत होती. व चिलमींतून तंबाखू ओढण्याचें काम सुरू होतें. एकदां बाबांनीं चिलमीचा झुरका मारला मग ती चिलम कोणाला तरी देत व ती फिरत फिरत जमलेल्या भक्तसमुदायांत जाई. परत दुसऱ्या वेळेला नवीन चिलीम. अशा दिवसांतून किती तरी बाऱ्या होत असत. ज्या कांहीं चिलमी सांपडल्या त्या त्यांचें स्मारक म्हणून मशिदींतील भिंतींत राखून ठेवल्या आहेत. त्यांच्याजवळ एक सटका नेहमीं असे. व दरबारी थाटाप्रमाणें गप्पा गोष्टी चालत.

लांबलांबून त्यांच्या दर्शनाला मनुष्य येत. व बाबा, आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल त्या इसमाकडे दक्षिणा मागत, व दक्षिणा आपल्या कफनीच्या लांब खिशांत घालीत. तसेंच दररोज त्याच खिशांतून कोणाला ४० रु. तर कोणास ५० रु., तमासगिर, गायक वगैरे जो कोणी त्यांच्या मंडपांत हजेरी देईल त्या सर्वांना इच्छेस वाटेल तितकी दक्षिणा देत व म्हणत कोणाचेंही उपकार फुकट घेऊं नये. अशा रीतीनें दर दिवशीं हजारों रुपयांची उलाढाल त्या खिशांतून करीत. जशी काय ती त्यांची तिजोरी होती. त्या बैठकींत बाबांच्या समोर व धुनीमाईच्या सन्निध एक रक्तपितीचा मनुष्य बसत असे. त्या वेळेस ओट्यांवर दगडांची रास होती. मंडपांत एक भला मोठा दगड आहे. त्यावर बाबा बसत व समोर भिंत आहे, त्याच्या मागच्या बाजूस शाळा होती. नंतर बाबांचा श्यामसुंदर नांवाचा घोडा तिथें बांधत असत, असो, दरबार बरखास्त झाला. व बाबा लेंडीला निघाले. आम्ही दिक्षीत वाड्यांत आलों.

लेंडीला जाण्याचा थाट और होता. बाबांना—ते उंच भव्य गोरे होते—दोन्ही बाजूनीं काखेंत उचलून धरीत. वरती छत्री धरत असत, व स्वतः कफनीचा झोळ हातानें एका बाजूला धरत. ज्या ठिकाणीं हल्लीं लेंडी बाग आहे त्या ठिकाणीं त्या वेळीं नुसतीं कडुलिंबाची झाडें व रान होतें. बाबाबरोबर आलेली मंडळी बसस्टँडच्या तिथें लेंडीबागेचें कुंपण आहे तेथें थांबत. बाबा एकटेच पाय वाटेनें, ज्या ठिकाणीं लेंडी बागेंत नंदादीप व पार बांधला आहे तिथें येत. तिथें दोन बादल्या पाणी भरून ठेवलेलें असें त्या जागीं मनाला मानेल तेवढा वेळ एकटेच बसत. त्या जागीं एक पत्र्याचें शेड होतें, व नंदादीप जळत असे. बाजूनें पाण्याचा प्रवाह—ओढा—हल्लीं सुद्धां आहे. विहिरी वगैरे हल्लींचें वैभव त्या वेळेस तेथें नव्हतें.

दुपारीं मध्यान्हीं आरती होत असे. आरतीच्या वेळेला प्रत्येक भक्त नैवेद्य आणीत. अशीं कितीतरी ताटे—पंच पक्वान्नांचे भोजन—तिथें बघण्यास मिळे. बाबा कांहीं भाग मनाला मानेल तेवढा घेत असत. बाकीच्यांना हात लावून प्रसाद म्हणून

परत करीत. बाबा मशिदींत जिथें निंबार आहे. तेथें उभे राहात अगर बसत असत. सर्व पुरुष खालीं मंडपांत असत, जिथें कांसव आहे, तिथें शामसुंदर घोडा सजवून आणीत. व तेथें उभा राही, दोन्हीं बाजूंनीं पुरुष मंडळी शिस्तींत उभी असे. शांततेनें आरती होई. व आरती झाल्यावर बाबा मशिदीच्या पायरीकडे येत. प्रथम शामसुंदर घोडा दोन पायऱ्यावर चढून जाई व बाबांच्या चरणांवर आपलें डोकें ठेवून नंतर बाबांच्या मुखाकडे पाहीं. बाबा त्याच्या कपाळाला उदी लावीत व डोक्यावर थापटीत असत. मग तो घोडा आपल्या जागेवर जाई. घोड्याबरोबर त्या वेळेस मोत्तदार अगर मनुष्य कोणी नसे, जणूं काय माणसांप्रमाणेंच सर्व कृती समजून तो करी. नंतर सर्व आलेली मंडळी एकामागून एक क्रमाक्रमानें बाबांच्या पायांवर डोई ठेवीत, व बाबा सर्वांना उदी लावून डोक्यावर थापटत व "अल्ला भला करेंगे" म्हणत. आरतीचा थाट पाहिला, सुखसोहळा अनुभवाला आला कीं वाटे, आपण स्वर्गीचेंच सुख अनुभवीत आहों—कारण असा थाट बाबांची मूर्ती वगैरे ह्या भूतलावर पाहाणे आतां शक्य नाहीं. आरती झाल्यानंतर प्रसाद वांटण्यांत येई. बाबांचा प्रसाद वांटण्याची रीत फारच न्यारी, कितीहि मनुष्य येवो, (प्रत्येकाला लहानापासून थोरापर्यंत आरडाओरडा, दंगामस्ती, गलबला न करितां शांत, समाधानानें मिळत असे. मशिदींतून परत साठेवाड्यांत यावयाचें)—हल्लीं ज्या ठिकाणीं गुरुपादुका आहेत, त्या ठिकाणींच चारी बाजूनें, मातीच्या (धाब्याच्या घराप्रमाणें) भिंतीचा तो वाडा होता.

त्याला दोन दरवाजे होते. मशीदींतून साठेवाड्यांतील मागील दिंडी दरवाज्यांतून एक एक मनुष्य येत असे—साठेवाड्यांत येणें तिथें निंबवृक्ष—त्यालासुद्धां मातीचा व दगडांचा पार सभोंवतीं बांधला होता. व तिथेंच एक लहानशी घुमटी मातीचीच होती. तिथें दिवा लावत असत. हेंच तें बाबांच्या गुरूंचें ठिकाण, बाबा प्रसिद्धीस येण्यापूर्वी ह्याच निंबवृक्षाखालीं बसत. त्या वेळेस ते तरुण होते.— एके दिवशीं खंडोबाचें वारें आलें. व त्या वाऱ्यानीं ह्या ठिकाणीं खणा म्हणजे पोराचा पत्ता लागेल. गांवकरी जमले; व खणूं लागले, तों त्यांना एक तळी लागली व तळी बाजूला केल्यावर एक खोली दिसली. त्यांत एक पाट, त्यावर जपाची माळ, दोन्ही बाजूला पेटत्या समया दिसल्या,—खंडोबाच्या वाऱ्यानें असें सांगितलें होतें कीं, ह्या पोरानें इथें बारा वर्षें तपश्चर्या केली—गांवकऱ्यांनीं बाबांना विचारलें असतां ते म्हणाले कीं, हें माझ्या गुरूचें स्थान आहे. तें आतां बंद करा. व ह्याची खूण म्हणून बाबांनीं निंबवृक्षाच्या एका बाजूच्या डाहाळीवर हात ठेवला. आणि म्हणाले कीं, आजपासून ह्या फांदीचा पाला कडू लागणार नाहीं.—अद्यापीहि एका बाजूचा लिंबाचा पाला कडू लागतो, तर दुसऱ्या बाजूचा पाला तुरट लागतो.

साठे वाड्यांत आल्यावर अनायासें गुरुपादुकाला प्रदक्षणा होत असे. दर्शन होत असे. व नंतर पुढच्या दरवाज्यावर दोन्ही बाजूस बर्फीचीं ताटें घेऊन उभे असणारे सेवेकरी प्रत्येकाला बर्फीचा मोठा तुकडा प्रसाद म्हणून देत असत.

बाबा एक दिवसाआड चावडींत जात असत. चावडीचा थाट पाहाण्यासारखा असें. बाबांच्या मूर्तीवर छत्रचामर, अबदागीर, पुढें पालखी, त्याच्यापुढें शामसुंदर घोडा व सर्वांपुढें वाजंत्री अशा थाटांत वाजतगाजत बाबा हळूहळू चावडींत जात. तिथें गेल्यावर बाबांना बसण्याकरितां गाद्या गिरद्या वगैरे संस्थानीं थाट असे. हल्लींची चावडी दगड विटा सीमेंट वगैरेनीं बांधली आहे. पूर्वी एक मातीचें पडकें घर होतें. दोन खण होते. एका खणांत देवादिकांचे बरेंच फोटो व आरसे लावलेले होते. हल्लीं सुद्धां आहेत. जमीन मातीचीच होती. तिथेंच बाबांची आरती होई. एक विशेष म्हणजे 'आरती ज्ञानदेवाची' ज्ञानेश्वराची आरती सुरू झाली, कीं बाबा स्वतः उभे राहात व हातानें टाळी वाजवत, बाकीच्या सर्व आरत्यांत ते बसलेले असत. नंतर प्रसाद झाला म्हणजे, परत बाबा सर्वांना स्वतः उदी देत. नंतर त्यांच्या बरोबर आणलेल्या गाठोड्यांतून ६०।६५ चादरी एकावर एक पसरत व त्यावर शयन करीत.

आम्ही चार पांच दिवस शिरडीला होतों. संध्याकाळीं मात्र पांढरपेशा मंडळीस ते मशिदींत घेत नसत. एके दिवशीं सकाळीं दरबार भरला होता. माझ्याकडे बाबांनीं दोन पैसे मागितले. माझें वय १० वर्षांचें होतें. माधवराव देशपांडे यांनीं माझा हात धरला, उगाचच (लुटुपुटुचे) बाबांच्या हातावर हात ठेवून मला म्हणाले, बाबांना सांग हे घ्या पैसे. त्याप्रमाणें मी केलें. बाबांनीं उगाचच कफनीच्या खिशांत हात घातला व "लिया" म्हटलें.

बाबांची परवानगी घेतल्याशिवाय कोणीही शिरडीबाहेर जात नसत. आम्हीं सकाळींच मशिदींत गेलों. काकांनीं नमस्कार केला व जाण्याची परवानगी मागितली. त्यावेळीं बाबा खांबाला टेकून बसलें होते. व त्यांच्या पायांना तेल लावणें, रगडणें (मर्दन करणें) चाललें होते. मला बाबांनीं बोलावलें. मीं नमस्कार केला व त्यांच्या पायांवर मस्तक ठेवलें. "मै तेरा पिछे हूं" असें म्हणाले. पसाभर उदी दिली व आम्हांला शिरडी सोडण्यास परवानगी दिली. आणि आम्हीं घरीं अनाळ्याला आलों.

१९३५ च्या जानेवारीच्या १६ व्या तारखेस मी परत सीक झालों. मोठमोठे डॉक्टर उशाशीं बसलेले होते. मी बेशुद्ध स्थितींतच जवळ जवळ पंधरा दिवस होतो. रक्त, लघवी, परसाकडे वगैरे तपासून आणलें. मोठमोठे डॉक्टर आणले परंतु रोगाचें निदान कांहीं होईना व माझी आशा सर्वांनीं सोडली. माझ्या सौ० ला श्री बाबांची आठवण झाली आणि तिनें संध्याकाळीं बाबांच्या फोटोकडे जाऊन नारळ ठेवून विनंति केली कीं, "हे सद्गुरु साईनाथा, मला आपणांविषयींच्या ह्यांनीं पुष्कळ गोष्टी सांगितल्या आहेत, आपण त्यांना लहानपणीं वांचविलें आहे. आतां मला एवढी चुडेदानाची भीक घालावी. ते बरें झाल्यावर दवाखान्यांत जाण्यापूर्वी मी त्यांना घेऊन आपल्या समाधीचें दर्शन घेईन." दुसरें दिवशीं माझा ताप उतरला मी शुद्धीवर आलों व बरा झालों.

१९३५ च्या एप्रिल महिन्यांत दवाखान्यांत जाण्यापूर्वी मी परत कुटुंबांसह शिर्डी मुक्कामीं आलों. त्यावेळीं मुंबई ते दौंड मनमाड असें सात दिवसांचें 'Triangular'

तिकीट जी. आय्. पी. चे मिळत असें. मी, माझी पत्नी, लहान दोन वर्षांचा मुलगा दिनू, मेहुणा बाळाराम व शेजारीं माळगांवकर असें शिरडीस जाण्यास निघालों. वाटेंत नाशिक क्षेत्र करून मग पुढें जाण्याचा आमचा बेत होता, परंतु नाशिक स्टेशनला उतरण्याच्या वेळीं तेथें प्लेगची साथ जोरांत असल्याचें समजलें. आमचा बेत बाबांनीं अशा प्रकारें रद्द करवून थेट शिरडी मुक्कामीं आणलें. जवळजवळ २० वर्षांनीं शिर्डीला माझें येणें झालें होतें. तेथें गेल्यावर मला १९१६ सालची आठवण झाली. व सर्व गुरुपादुका, निंबवृक्ष, लेंडी बाग, द्वारकामाई, मशिद, चावडी, वगैरे पाहून देहरूपी बाबा नाहींत पण चैतन्यरूपी बाबा येथें आहेत अशी माझी खात्री झाली. व माझा शिरडीमध्यें बाबा नाहींत हा झालेला गैरसमज बाबांनीं अशा प्रकारें दूर केला. त्या वर्षापासून सद्गुरु साई बाबांचीं निरपेक्ष बुद्धीनें सेवा करण्याचा निश्चय केला, व त्या दिवसापासून सद्गुरु साईबाबांनीं मला अध्यात्मिकाचा नवीन मार्ग दाखविला.

**डॉ. केशव (मधुकर) भ. गव्हाणकर.**

[ विनंति करून सुद्धां श्री साईविषयींचे आलेले अनुभव प्रसिद्धीस सांई भक्तगण सांईलीलेंत पाठवित नाहींत ही शरमेची गोष्ट आहे. साई–लीला त्रैमासिक अव्याहत सुरू रहावें म्हणून मला स्वतःला आलेलें अनुभव प्रसिद्ध करणें भाग पडत आहे. तरी विपरीत अर्थ कोणी घेऊं नये. ही विनंति. **संपादक** ]

[ २ ]

मी राहाण्यास मसुरे–टोकळवाडी मालवण, संतसाधु ह्यांच्या अख्याईका माहित आहे. शिरडीचे साईबाबा यांचेविषयीं मला कांहींच माहित नाहीं. माझी मंडळी मुंबईत हॉस्पिटल मध्यें बाळंत झाली. अकरा दिवसानंतर घरीं आणली. डॉक्टरी व वैद्यांचे उपाय दोन दिवस केले. परंतु अंगावरचें दूध सुटेना; कंटाळलों. आणि वेड्यासमजुती प्रमाणें बाहेरचें कांहीं (भूत बाधा) असेल अगर एखादा ग्रह वांकडा असेल तर त्याची शांती करावी, ह्या दृष्टीनें तपास करण्याकरितां घराच्या बाहेर पडलों. फोरास रोडला रा. रा. आत्माराम भगवान मसुरकर यांची गांठ पडली व त्यांना माझ्या मंडळीची हकिकत सांगितली व विचारलें कीं, तुझ्या पहाण्यांत एखादा मंत्रि अगर चांगला ज्योतिषी असेल तर सांग. मसुरकर म्हणाले, मला एक ज्योतिषी माहित आहे. पण सध्यां तुला नांव सांगत नाहीं. मी देतों तेवढें कर आणि मग मला सांग. मीं म्हटलें बरें आहे. मी त्यांच्या घरीं गेलों. तिथें साईबाबांचा फोटो होता. मला म्हणाले हा फोटो तुमच्या माहितीचा आहे काय? हेच आमचे ज्योतिषी. हे ह्या कालियुगांत सिद्धपुरुष होऊन गेले. त्यांची समाधी शिरडीला आहे. मी रामनवमीच्या उत्सवाला गेलों होतों. तेथून त्यांच्या समाधीचें तीर्थ आणि उदी आणली आहे. ती मी तुम्हाला देतों. त्याप्रमाणें मीं ती घरीं आणीली व मंडळीस तीर्थ पाजलें, व उदी लावली. चमत्कार असा झाला कीं, दोन्ही स्तनांतून भरपूर दूध सुटलें. अवघ्या सहा तासांतच येवढा चमत्कार झाला. खरोखरच आम्ही हतभागी कीं साई बाबांचे आम्हांला दर्शन झालें नाहीं. संताचा महिमा ते समाधिस्थ झाले तरी चालूच राहातो हें ह्या वरून सिद्ध झालें.

**अनंत सदाशिव तावडे**


५।५।४९

# श्रीदत्तचित्साइसद्गुरुभ्योनमः

**शिरडी येथील नेहमीं निवास करीत असलेल्या मशिदीला बाबा द्वारकामाई कां म्हणत याबद्दलचें संशोधनः—**

(मागील अंकावरून पुढें चालू)

श्रीकृष्ण परमात्म्याची जन्मकुंडली.




अठ्ठावीस युगांत श्रीकृष्ण परमात्म्याचे किती अवतार झाले असतील, व त्यांपैकीं ही कोणते अवताराची पत्रिका आहे व किती वर्षांपूर्वीची आहे, हें ज्योतिर्विदांनीं लक्ष-पूर्वक अभ्यास करून ठरवावें, व त्यांतील सत्यासत्यता व ग्राह्याग्राह्यता जनतेच्या नजरेला आणावी अशी सविनय प्रार्थना आहे, या कुंडलीचा उपयोग शिरडी ही द्वारका कोणत्या कालीं होती, त्याच्या कालनिर्णयाकरतां कदाचित् होऊं शकेल.

वरील माहितींत कित्येक ठिकाणीं असंबद्धता दिसेल. तथापि संशोधकांनीं अति, अतिकाळाकडे नजर देऊन व पुराणातील सांकेतिक भाषा व अंक—खुणा यांजकडे लक्ष देऊन संगति लावल्यास ह्याच मशिदीचा प्रस्तुत संशोधनाला उपयोग होईलसें वाटतें.

या माहितीवरून जीं ढोबळ अनुमानें निघतात तीं खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ श्रीकृष्ण परमात्म्याचा अवतार होण्यापूर्वी कोणतीही व कोठेंही द्वारका नांवाची नगरी अस्तित्वांत नव्हती.

१ श्रीकृष्ण हे मथुरा नगरींत कंस राजाच्या कारागृहांत जन्मले. त्याच रात्रीं त्यांना गोकुळांत नेण्यांत आलें. त्यांनीं गोकुळ व वृंदावन येथें आपलें बाळपण अक्रूर व बलराम यांच्यासमवेत घालविलें. नंतर मथुरेवर जरासंधानें १७ हल्ले केले. त्यांत जरासंधच पराजित झाला. त्यानें पुन्हां १८ वा हल्ला मथुरेवर चढविला. कालयवनही मोठें सैन्य घेऊन याच वेळीं मथुरेवर आला. ही बातमी श्रीकृष्णाला लागताच ते मथुरेला गेले. कंसाला मारून, जरासंध व कालयवन यांचे हल्ले परतवून उग्रसेनाला कंसाच्या कारा-गृहांतून सोडवून त्याला पुनरपि मथुरेच्या गादीवर बसविण्याच्या दरम्यानच्या काळांत श्रीकृष्णांनीं मथुरेंत स्वतः कांहीं काल राज्य केलें. उग्रसेनास मथुरेच्या गादीवर बसविल्या-नंतर आपल्याकरितां आनर्त देशांत समुद्रापासून जागा घेऊन त्या जागेवर हल्लींच्या

द्वारकेजवळ, किंवा ओखा बंदराजवळ किंवा रैवत पर्वताजवळ द्वारकानगरी सोन्याची द्वारकानगरी– निर्माण करून त्यांत राहिले.

३ सौराष्ट्र व आनर्त हे निरनिराळे देश नसून सौराष्ट्र म्हणजेच आनर्त. ह्या आनर्त देशांत निर्माण केलेली हीच प्रथम किंवा मूळ द्वारका असावी. ही द्वापार युगांतील द्वारका.

४ यादवी अति माजली, म्हणून ही द्वारका समुद्रांत बुडवून कृष्णभगवन् निजधामास गेले.

५ वर लिहिलेली, म्हणजे हल्लीं अस्तित्वांत असलेली द्वारका ही दुसरी द्वारका आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे, व याबद्दल दुमत होणें संभवनीय किंवा शक्य नाहीं.

६ श्री स्कंद पुराणांतील प्रल्हाद संहितेंत सांगितलेल्या द्वारका महात्म्याच्या पहिल्या अध्यायांत असें लिहिलें आहे कीं, यदुकुलाचा नाश झाल्यावर श्रीकृष्ण प्रभास क्षेत्रांत पिंपळ वृक्षाच्या बुंधाच्या आश्रयानें राहिले होते. प्रल्हादजींच्या सांगण्यावरून ऋषिमंडळ कलियुगाच्या प्रारंभीं तेथें गेलें. आपण पृथ्वीवर यावें, धर्माचें व गोब्राह्मणांचें रक्षण करावें अशी विनंति केल्यावरून समुद्राकडून १२ योजनें जागा मागून घेऊन त्यावर द्वारका नगरी बांधून श्रीकृष्ण परमात्मा तेथें राहिले. ही कलियुगांतील द्वारका.

याच अध्यायांत असेंही लिहिलें आहे कीं, पश्चिम समुद्राच्या तीरावर कुश दैत्यानें स्थापन केलेली कुशस्थली नांवाची एक नगरी आहे. तिला पण द्वारकाच म्हणतात. तेथें श्रीगोमती गंगा समुद्रास मिळते. तेथें कृष्ण भगवान हातांत शंख, चक्र, गदा, पद्म, धारण करून राहतात.

वरील दोन्हीं वर्णनें हल्लीं अस्तित्वांत असलेल्या द्वारकापुरीला लागू पडतात.

वरील पौराणिक माहितीवरून व त्यावरून निघत असलेल्या अनुमानावरून मूळ द्वारकेचा किंवा हल्लीं अस्तित्वांत असलेल्या द्वारकेचा संबंध नगर–सोलापूर जिल्ह्यांशीं सोयरिका, लढाया, व भक्तेच्छा खेरीज करून प्रस्तुत संशोधन कार्याशीं, पोचेलसें दिसत नाहीं. मग बाबांच्या वचनाची काय वाट ?

मूळ द्वारका पश्चिमोत्तर दिशेला गोकुळ, वृंदावन, मथुरा, हस्तिनापूर ( दिल्ली ), कुरुक्षेत्र वगैरे स्थलांच्या सन्निध बांधण्यास व ती समुद्रांत बुडवून, तिकडच्याच भागांत दुसरी द्वारका निर्माण करण्यास जशीं कांहीं विशेष कारणें झालीं, तशाच कांहीं विशिष्ठ कारणानीं तिसरी एखादी द्वारका कोणत्या तरी युगांत व अवतारांत नगर, सोलापूर व सातारा जिल्ह्यांच्या भागांत निर्माण झाली असेल, तरच बाबांच्या वचनांची संगति लागून सत्यता पटेल. करतां ह्या तिसऱ्या दक्षिण–द्वारकेच्या निर्मितीबद्दल पौराणिक, भौगोलिक व इतर कांहीं माहिती मिळते कीं काय हें पाहूं.

यदुवंशानंतर मोर्यवंशाचे राजे झाले. त्यावेळीं त्यांचें राज्य उत्तरेला हिमाचलापासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत व पूर्वेला मगधापासून पश्चिमेला सौराष्ट्रापर्यंत पसरलें होतें. म्हणजे सबंध महाराष्ट्र त्यावेळीं यदु वंशज राजांच्या आश्रयाखालीं होता, व तेव्हांपासून श्रीकृष्णाच्या ५५ व्या किंवा ६० व्या पिढीपर्यंत यादवांचेंच राज्य होतें. श्रीकृष्ण हे

विक्रम संवत्पूर्वी २५२५ वर्षें होऊन गेले असें वरील यादव वंशाचे हकीकतीवरून दिसून येईल.

नुतकाच सन १९३५ ता. १८ जुलई रोजीं टाइम्स ऑफ इंडियांत सातारचे कै. धर्मवीर श्री. विष्णुपंत करंदीकर यांनीं जो लेख प्रसिद्ध केला, त्यांत खिस्त शकापूर्वी २६०० वर्षांवर कोल्हापूर किंवा पन्हाळगड या ठिकाणीं यादव कुलांतील पद्मवर्ण नांवाच्या राजानें वसाहत केली. पन्हाळगड हा सह्य पर्वतावर आहे, व कोल्हापूर सपाट जागेवर आहे. करितां यादवांची वस्ती प्रथम पन्हाळगडावर झाली असावी. कारण सपाटीवर वस्ती करण्यासारखा तो काल व प्रदेश नव्हता. म्हणून कोल्हापूरची वस्ती पन्हाळगडच्या वस्तीनंतर झाली असली पाहिजे. पद्मवर्ण राजाचा थोरला भाऊ यानें त्याचवेळीं श्रीनर्मदामाईच्या कांठावर यादवांची वसाहत केली, असें लिहिलें आहे. नर्मदा किनारा, पन्हाळगड व कोल्हापूर यांच्यामध्यें नगर, सातारा व सोलापूरचा प्रदेश येतो. अर्थात् यावरून नगर, सातारा, सोलापूर जिल्ह्यांत यादवांची वसाहत २६०० वर्षांपूर्वी होती, असें उघड होतें.

श्री. कै. बापूसाहेब करंदीकर यांचे ता. १७ ऑगष्ट १९३४ व वरील ता. १८ जुलई १९३५ असे दोन लेख मी वाचल्यावर माझा व त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. तोंपर्यंत ते मला किंवा मी त्यांना ओळखत नव्हतों. त्या पत्रव्यवहारावरून त्यांचें मत, अति अति प्राचीन काळीं शिरडीला द्वारका होती, पण ती सोन्याची द्वारका (म्हणजे मूळ द्वारका) किंवा दुसरी द्वारका हें, खुद्द शिरडीला व शिरडीच्या आसपास कोणत्या गांवीं व ठिकाणीं पूर्ण संशोधन झाल्यावांचून निश्चित सांगतां येणार नाहीं असें होतें. शिरडीला द्वारका होती हें सिद्ध करण्यास आपल्याजवळ पौराणिक व भूगर्भशास्त्राचा भरपूर पुरावा आहे, व संशोधनकार्यासाठीं ते पूर्वी एकदां बाबा हयात असतांना शिरडीला येऊन गेले होते, व आमच्या विनंतीवरून ते गेल्या सालच्या म्हणजे सन १९३६ च्या फेब्रुवारीच्या ४ तारखेला त्यांचे मावसबंधू श्री. परांजपे यांसह शिरडीला येऊन ता. ५ रोजीं मुक्काम करून, गांवांत व आसपासचे रुई, राहतें, निमगांव, कोकमठाण व संवत्सर वगैरे गांवास जाऊन ता. ६ रोजीं नगराला परत गेले.

अगदीं अलीकडे म्हणजे ७००–८०० वर्षांपूर्वी पर्यंत यादव वंशांतील राजांचें राज्य महाराष्ट्रावर होतें असें प्रत्यक्ष इतिहास सांगतो.


श्री ज्ञानेश्वर महाराजही आपल्या श्री ज्ञानेश्वरी माईच्या १८ अध्यायांतील खालीं दिलेल्या ओंव्यांत तेंच सांगतात.

ऐसें युगीं परी कली । आणि महाराष्ट्र मंडळीं ॥
श्रीगोदावरीच्या कूळीं । दक्षिण लिंगीं ॥ १८०३ ॥
त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ॥
जेथ जगाचें जीवनसूत्र । श्री महालया असे ॥ १८०४ ॥
तेथ यदुवंश विलास । जो सकल कला निवास ॥
न्यायातें पोषी क्षितीश । श्रीरामचंद्र ॥ १८०५ ॥

श्रीरामचंद्र म्हणजे त्यावेळीं खुद्द नेवासें येथें (शके १२१२) राज्य करीत असलेले यदुवंशांतील राजे रामदेवराव जाधव हे होत असें स्पष्ट दिसतें.

आतां ७००–८०० वर्षांपूर्वी पर्यंत म्हणजे मुसलमानांचा अंम्मल सुरू होईपर्यंत जर महाराष्ट्रांत मौर्य वंशापासून यादवांचें राज्य होतें तर त्या अवधींत श्रीकृष्ण हे केव्हांतरी महाराष्ट्रांत येऊन राहणें संभवनीय दिसतें व त्याचप्रमाणें इकडे एखादी द्वारका ही निर्माण केल्याचें संभवनीय दिसतें.

श्री. विनायक मोरेश्वर भट माजी इतिहास शिक्षक ट्रेनिंग स्कूल नाशिक, हल्लीं प्राक्टिसिंग स्कूल शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें यांनीं मराठी पांचवी व इंग्रजी पहिल्या इयत्तेकरतां लिहिलेल्या हिंदुस्थानच्या "सोपा व सचित्र इतिहास" नांवाच्या पुस्तकांत इ. स. १०२२ सन घालून पान ४१ वर हिंदुस्थानची खालीलप्रमाणें आकृति देऊन त्यांत खालील ठिकाणीं द्वारावतीपूर म्हणून शहर दिलें आहे.




या नकाशांत द्वारका हल्लींच्या ठिकाणीं म्हणजे पश्चिमेला सौराष्ट्रांत किंवा आनर्तांत न दाखवितां दक्षिणेंत "द्वारावतीपूर" म्हणून दाखविली आहे. ही माहिती त्यांना कोठून व कशी मिळाली व खरोखरच त्यांनीं वर दाखविल्या ठिकाणीं द्वारावतीपूर म्हणजे द्वारका होती असें इतिहास सांगत असेल तर हा काल कोणता, त्यावेळीं या द्वारकापुरांत कोणते राजे राज्य करीत होते व हें द्वारावतीपूर कोणीं कधीं व कशाकरतां बांधलें व त्यावेळीं सौराष्ट्रांत खरोखरीच द्वारका नव्हती कीं काय, वगैरे माहिती श्री. भट यांना समक्ष भेटून त्यांच्याकडून घेण्यास मला वेळ मिळाला नाहीं. श्री. भट यांनीं वरील नकाशा कांहीं तरी भक्कम आधारावरून दिला असावा. तो प्राचीन भारताचा दिसतो.

तसेंच श्री. रामचंद्र सदाशिव जोशी हेडमास्तर, ट्रेनिंग स्कूल, भिवंडी यांनीं लिहिलेल्या हिंदुस्थानच्या कालक्रम इतिहासांत सन ८२५ नंतर उत्तरेच्या बाजूस देवगिरीचे यादव, पूर्वेला एक शिलापुरी (तेलंगणांत वरंगळ) येथील काकतीय आणि दक्षिणेला द्वारसमुद्र (म्हैसूर येथील वेळगोळ) येथील होयसळ बल्लाळ यांची सत्ता चालू होती, असें लिहिलें आहे. यावरून दक्षिणेंत महाराष्ट्रांत, तेलंगण म्हैसूर या ठिकाणीं समुद्र होता. अर्थात् हा गोड्या पाण्याचा समुद्र असला पाहिजे, व त्यासच द्वारसमुद्र हें नांव द्वारावतीपूर किंवा द्वारकानगरीवरून पडलें असलें पाहिजे व त्या समुद्राच्या किनाऱ्यावर हल्लींचें नगर, सातारा, सोलापूर, कानडा वगैरे जिल्ह्यांच्या आसपास द्वारकानगरी किंवा द्वारावतीपूर असलें पाहिजे असें दिसतें. श्री. जोशी यांच्याकडूनही वरील खुलासा त्यांना समक्ष भेटून, करून घेण्यास मला अवधी मिळाला नाहीं.

वर दिलेल्या दोन भौगोलिक उताऱ्यांवरून फक्त इतकेंच अनुमान काढतां येतें कीं, पूर्वी केव्हांतरी दक्षिणेंत महाराष्ट्रांत नगर जिल्ह्याच्या बाजूस द्वारका, द्वारावती, द्वारवती, द्वारावतीपूर या नांवाची एक नगरी होती, व तेथें समुद्रही होता, व त्या समुद्राला द्वारसमुद्र असें म्हणत असत. पण या उताऱ्यावरून तो काळ निश्चित करतां येत नाहीं. असो.

या संशोधनासंबंधीं कै. बाबासाहेब तर्खड यांनीं सन १९३४ सालानंतर ता. १८–७–३५ च्या टाइम्स ऑफ इंडियांत आलेल्या कै. धर्मवीर विष्णुपंत करंदीकर यांचा पन्हाळगड व कोल्हापूर ह्यापूर्वी यादव वसाहती होत्या अशा माहितीचा लेख आल्यावरून (व ज्याबद्दल मी पूर्वीच खुलासा केला आहे.) ता. १९–७–३५ रोजीं मला लिहिलेल्या कार्डांत ते म्हणतात कीं, "कालच्या टाइम्स ऑफ इंडियाची एक प्रत आज टपालांतून (मजकडे) पाठवून देत आहे. श्री अंबाबाई (कोल्हापूरची) देवालयाच्या पाठीमागें श्री. देवस्थानें यांच्या शाळेंत इ. स. १९२० सालीं मी दडून गेलेल्या समाधी पाहिल्या आहेत, त्यामुळें Was Kolhapur a Yadav Colony?

याचा विचार करतां श्रीकृष्णभगवान डिंडिरवनामध्यें संचार करीत असतां, श्री शिरडी हें त्यांचें उत्तरेकडील स्थान असणें संभवनीय आहे. त्यामुळें आपल्या बसत्या जागेला श्रीसाईबाबांनीं द्वारकामाई कां म्हणावें याचा शोध खुद्द शिरडीलाच लागावा असें मला वाटतें. श्रीशिरडींतील गढी व समाधि–मंदिरांतील दक्षिण बाजूकडील उंचवट्याची जागा येथेंच अपूर्व शोध लागावा असें मला कित्येक वर्षांपासून वाटत आहे. सदरील उंचवट्याच्या जागेंत मोठमोठीं भुयारें आहेत असें ऐकिवांत आहे." भुयारें आहेत ही गोष्ट खरी आहे व त्यांपैकीं एक मी, बाबासाहेब व विष्णुपंत करंदीकर यांनीं समक्ष पाहिलें आहे. याच गढीवर एक राजा रहात असे, असें बाबा आपल्यास नेहमीं सांगत असत, श्री. माधवराव बळवंत देशपांडे यांनीं मला पुष्कळ वेळां सांगितलें आहे व अजूनही सांगतात.

आतां माझा व कै. श्री धर्मवीर विष्णु रघुनाथ ऊर्फ बाबासाहेब करंदीकर यांचा या संशोधन कार्यासंबंधीं जो पत्रव्यवहार झाला, तो अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें तो बहुतेक जशाचा तसाच खालीं देत आहें.

ता. २१–८–३५ चें पत्रः—श्री महाराजांचा व माझा अनेक वर्षांपूर्वी संबंध आला होता. माझें कार्यक्षेत्र वेगळें असल्यामुळें जास्त लाभ झाला नाहीं. पण मीही या मार्गांतील जिज्ञासू व अभ्यासू आहे. शिरडीला किंवा त्याजवळ इ. स. पूर्वी २ ते ३ हजार वर्षांपूर्वींचें अवशेष असले पाहिजेत, अशी माझी खात्री आहे. या ठिकाणीं द्वारका होती. पण त्यांविषयीं कांहीं विशेष प्रकार आहे तो आपणांस या पत्रीं कळविण्याचा प्रयत्न करतों. पत्रीं लिहितां येत नाहींत, अशाही कांहीं गोष्टी आहेत. त्यामुळें अडचण होते खरी. पण आपण महाराजांच्या भक्तवर्गापैकीं असल्यानें भावार्थ सहजीं ध्यानांत येईल.

**संतवचन सत्य तर खरेंच पण त्यांत अत्यंत गूढ ज्ञान असल्याकारणानें त्या वचनाचें स्वरूप पुष्कळ वेळां भूल पाडणारें असतें.** ही गोष्ट अत्यंत जागरुकतेनें ध्यानांत ठेविली पाहिजे. पूर्वी आर्यावर्त ही संज्ञा हिमालय ते विंध्याचल, सिंधु ते ब्रह्मपुत्रा या भागाला लावीत असत. त्या आर्यावर्तांत मथुरा वृंदावन केंद्रस्थानीं ठेवून भगवंतांनीं अप्रतिम असें सहस्त्रदल चक्र निर्माण केलें. एक द्वारका. एक बद्रीनारायण, एक पुरी अशीं तीन टोकें या चक्राच्या पाकळ्यांची होतीं. याप्रमाणें स्वर्गोत्तर भागीं ज्याला उत्तर कुरु म्हणतात, त्यांत स्वर्गीय वैकुंठ दुसरें चक्र होतें, त्याचीहि माहिती मिळते. तसेंच नर्मदेच्या खालचा भाग पाताळ असून त्यांत श्रीभगवानाची आणखी एक मूर्ति असे. या ठिकाणींहि ही वरीलप्रमाणेंच पंढरपूर केंद्रस्थानीं ठेवून सभोंवार पाकळ्या पसरत नेल्या आहेत. प्रतिष्ठान (पैठण), नेवासें, शिरडी, आळंदी, परळी (श्रीसमर्थ रामदासस्वामींची,) विजयनगर अशीं निरनिराळीं टोकें या पाकळ्यांची आहेत. शिरडी हें या पाकळ्यांची द्वारका होय. ज्यावेळीं भगवान दिंडीरवनांत आले, त्या वेळीं ह्या स्थानाला बाह्य स्वरूप देण्यांत आलें.

बाकी, **जनलोक** हा श्वेतवराह कल्पाच्या आरंभापासूनचा आहे. नारायणांनीं वराहरूप धारण केलें, तेव्हां तत्पूर्वी निमित्त असलेल्या रसातळाला लागून हा जनलोक होता, त्यावेळेपासून वराह अवतार ज्या क्षेत्रावर झाला, त्याचें केंद्र (पंढरपूर) हें स्थान होतें. किती कोटी वर्षांपासून हें स्थान भगवत्तेजानें युक्त आहे, हें आज सांगतां येत नाहीं. पण आर्यावर्तांतील किंवा स्वर्गोत्तर भागांतील स्थानापेक्षां हें फार फार प्राचीन स्थान आहे.

संतवचनाची जाणीव किती कालामागें आपल्याला नेऊं शकेल ? आपण वर अगदीं त्रोटक अशा रीतीनें लिहिलेल्या गोष्टींचें समालोचन केलेंत, तर आपल्या अंतःकरणांतील भक्तिभावना आपल्याला स्फूर्तीच्या लाटेवर कालाच्या अगाध पोटांत फिरवील व मग 'द्वारका' कोणती याची जाणीव होईल. "सोन्याची" द्वारका ! हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् तत्वंपूषन्न पावृणु सत्य धर्मीय दृष्टये (ईशावस्योपनिषद् मंत्र १५) अशी सद्गुरुचरणाची प्रार्थना केली, तर अंतःकरणामध्यें नेणिवेंतील रत्नें मंथन करून जाणिवेच्या खजिन्यांत येऊन पडतील यांत शंका नाहीं.

दक्षिणेंतील या गुप्त तेजाला बाह्य स्वरूप जेव्हां मिळालें, त्यावेळीं "द्वारका" दाक्षिणेंतील द्वारका, दक्षिणोदधि ज्वाला वडवाब्धि असें म्हणत असत, त्याच्या उदरांतून बाहेर पडली. श्रीरामचंद्राच्या अगोदर कांहीं काळ हा भाग "उदित" झाला. त्यावेळेपासूनचा इतिहास अवगत होईल. प्रयत्न जरूर पाहिजे.

माझ्या अल्प मतीला काय वाटलें तें कळविलें आहे. आपण त्या विषयीं विचार करून ध्यानीं आणून पहावें. पटलें तर मला कळवावें. जास्त विचार करतां येईल.

ता. ३–९–३५ चें पत्रः—आपलें कार्ड आलें. माझ्या मागील पत्रांतील विचारसरणी कांहीं निराळ्या प्रकारची होती. पहिल्या पानावरच्या शेवटच्या पॅरिग्राफचें पहिलें वाक्य "संत वचनें सत्य खरीं" वगैरे संपवितोंपर्यंत–मनामध्यें अमुक रीतीचें उत्तर आहे अशा विषयीं कल्पनाही नव्हती. पण या गूढाचें कांहीं तरी निराळें उत्तर असावें असें अंतर्यामीं खास वाटत होतें. आपण तारखांकडे पाहिल्यास पत्र लिहिल्यानंतर दोन तीन दिवसांनीं पोष्टांत टाकलें याचें कारण आंतील विधानें अंतर्यामीं वसत असलेल्या आत्म्यांना सत्य अशीं खात्रीलायक वाटत असलीं तरी बुद्धीला पटेपर्यंत गृहीत धरून निदान दुसऱ्याकडे पाठवावयाचीं नाहींत अशी माझी ठाम समजूत. त्याप्रमाणें पाहतांः—

१ भूगर्भ शास्त्ररीत्या Deccan Plateau जन लोक श्वेतवराह अवताराच्या वेळीं रसातळाशीं युक्त होता कल्पपूर्व सृष्टींत–अनुभव प्राप्त होता. Perceptibly existing हें मला सिद्ध Geology व पुराणें यावरून करतां येतें.

२ स्वर्गांत व भूतलावर On upper Himalaya's Plateau and Aryavart– between Himalaya & Vindya and Sindhu & Brahmaputra सहस्त्र दलचक्र होतें, हें पद्मांत (पद्मपुराणांत) वर्णन आहे. त्यावरून पातालांत असलेंच पाहिजे. असें अनुमान.

३ पंढरपूर हें केंद्र समजून घेण्यास मुळींच हरकत नाहीं. ऐतिहासिक सत्य स्पष्ट आहे.

४ भगवान इकडे आले होते. व पंढरीचें स्थान पवित्र मानून तेथें राहिले हेंही निर्विवाद आहे.

५ शिरडी हें प्राचीन काळांतील द्वारका क्षेत्र असावें यास खुद्द संतवचनाच्या बाबांच्या संतवचनाचा आधार.: द्वारका या चक्रांत पाहिजे. कोणती हें ठरविण्यास एक संशोधन किंवा एक संतवचन. पहिल्याच्या अभावीं दुसरें ग्राह्य धरलेंच पाहिजे.

इतकी विचारपरंपरा मनांत ज्या वेळीं पूर्ण झाली, त्यावेळीं तें पत्र धाडलें.

आपल्यापासून कोणतीही गोष्ट गुप्त ठेविली नाहीं. यास जेवढा विचार करणें जरूर होतें तें लिहून झाल्यावर झालें. ज्ञान असलें तर तें माझें नव्हे. चूक असल्यास मात्र ज्याप्रमाणें सूर्यकिरण खिडकींतून आंत येत असतां कांचा मलीन असल्या तर अंधारमयच येतात, तशी माझ्या मनाची स्थिति झाली असली पाहिजे. त्याबद्दल आपण माफ करालच.

आतांपर्यंतच्या माझ्या संशोधनांत माझा अनुभव असा कीं, मनांत असुक असुक असलेंच पाहिजे अशी भावना उत्पन्न होते व मग विचाराअंतीं बुद्धीला पटेल असें स्वरूप प्राप्त झालें म्हणजे मग त्याची जनतेपुढें मांडणी करावयाची. त्याप्रमाणें याही प्रसंगीं झालें आहे.

शिरडीला येणें शक्य असल्यास येईन. कदाचित् मध्यें मुंबईला जाण्याचा प्रसंग आला तर ठाण्यास भेटेन. तळमळ सर्वत्र आहे ! रत्नें प्राप्त होण्याची संधि आल्यास कोण सोडतो.

ता. ७–९–३५ चें पत्रांतील यासंबंधीं मजकूर अंतःकरणरुपी आकाशांत गंधर्व-नगरासारखीं अनंत रूपें येतात व जातात त्यावेळीं अंतःकरणांत प्रतिबिंबित होऊन क्षणैक का होईना, पण टिकून राहणारें जें दृश्य अनुभवास आलें तें टिपून काढलें. व बुद्धीला पटल्यावर आपणाकडे कळविलें. झालें हें संक्षोधन कार्य सुरवात करण्याकरतां मजला पुरेसें वाटतें. प्रत्यक्ष पाहिल्यावर मग कांहीं जास्त गोष्टी ध्यानांत आल्यास पाहूं.

नंतर ता. १२–९–३६ च्या पत्रांत लिहिलेल्या मजकुरापैकीं " कुंडीनपुराहून, नर्मदा, तापी, नद्यांमधून, गुजराथ, आनर्त व सौराष्ट्र यांजकडे जाणारा रथ जाण्यासारखा मार्ग असावा. " इतकाच मजकूर प्रस्तुत संशोधनाच्या कामीं उपयोगी पडण्यासारखा आहे. म्हणजे स्पष्ट झालेल्या श्रीरुक्मिणी मातुश्री ज्या मार्गानें द्वारकेतून दिंडिरवनांत तपश्चर्येकरतां आल्या तोच हा मार्ग आहे असें दिसतें.

इतकें लिहून झाल्यावर मलाच विष्णुपंतांना प्रत्यक्ष भेटण्याची अतिशय उत्सुकता व तळमळ वाटूं लागली. त्याप्रमाणें नंतर त्यांचा माझा पत्रव्यवहार होऊन मी ता. १ फेब्रुवारी १९३६ रोजीं सातान्यास गेलों, व त्यांना भेटून ता. ४–२–३६ रोजीं त्यांना घेऊन ता. ५–२–३६ रोजीं शिरडीला गेलों. तेथें त्यांनीं काय केलें याबद्दलची हकीकत पूर्वीच दिली आहे.

नंतर ता. १८–२–३६ रोजीं मला त्यांनीं पाठविलेल्या मराठी व इंग्रजी पत्रांत ते लिहितात कीं, शिरडीसंबंधीं लिखाणाला उद्यां सुरवात करून आपणाकडे पाठवून देईन. शिरडीच्या द्वारकामाईबद्दल विचार करतांना, कोपरगांव जवळील संवत्सर क्षेत्राला अतिशय महत्त्व येतें. संवत्सर क्षेत्राची कथा नारदाची होय. श्रीकृष्णाच्यापाशीं त्यांच्या सोळा हजार एकशें आठ स्त्रियांपैकीं कोणती तरी एखादी स्त्री दे असें मागून प्रत्यक्ष दर्शनानें खिन्न मन झालेला नारद गोदावरी तीरावर जाऊन स्नान करीत असतांना नारदी होऊन साठ संवत्सरांना प्रसवणारा नारद या क्षेत्रीं ही विलक्षण शक्ति अनुभवता झाला. श्रीकृष्ण त्यावेळीं जवळच असले पाहिजेत. कोठें होते ? श्री. बाबांच्या शिवाय दुसरा कोणी दाखला देण्यास राहिला नाहीं. पण जर जवळ असले, तर ते शिरडीला कां नसावेत ! अतएव या ठिकाणचें संशोधन थोडें बारकाईनें व्हावयास पाहिजे. पण संवत्सर क्षेत्राजवळ श्रीकृष्णांचा तळ अगर त्यांचें वसतिस्थान असलें पाहिजे.

दुसरी एक विचार करण्यासारखी गोष्ट ही कीं, या दक्षिणेच्या टापूंत श्रीकृष्णाचें आगमन वरचेवर होत असलें पाहिजे.


कृष्णा नदीला हें नांव तरी त्यांशि वाय कसें मिळेल ?

पंढरपूरचें क्षेत्र तरी त्यांचें केंद्रस्थान कसें होईल ?

दिंडीरवनांत ते कां गेले होते ?

विदर्भाकडून पश्चिमेकडे वळून मग दक्षिणेंत ब्रह्म भागाकडे जाण्याचा कोणता रस्ता होता वगैरे विचार करण्याजोग्या गोष्टी आहेत.

तसेंच बलरामानें द्यूत कलहांत रुक्मिला ठार मारलें. अर्थात् श्रीकृष्ण, बलराम वगैरे मंडळी या भागांत (विदर्भांत म्हणजे वऱ्हाडांत कुंडीनपुरींत म्हणजे भीमक राजाच्या राजधानींत म्हणजे श्रीकृष्णांच्या सासूरवाडी नगरांत) वारंवार येत असलीं पाहिजेत. यावेळीं शिरडी कोणत्या गहन–कुटील व्यापार रस्त्यावर होती ? नर्मदेच्या दक्षिण भागांत विदर्भ देश आहे. कुंडिनपूर किंवा कौडिन्यपूर वऱ्हाडांत (विदर्भांत) जिल्हा उमरावती ता. चांदूर येथें वर्धा नदीच्या तीरावर आहे. येथें विठ्ठल रुक्म्यांची यात्रा भरते.




कुंडीनपूर हेंच कोडिनार असावें असें महाराष्ट्र ज्ञानकोशकार लिहतात.

बापुसाहेब (कै. विष्णूपंत) करंदीकरांचा व माझा यासंबंधीं पत्रव्यवहार झाला नाहीं. पण ते मला ठाण्यास १९३५ च्या जून महिन्यांत भेटले, व शिरडीला येऊन ८।१० दिवस राहून पुन्हां चांगलें संशोधन करण्याच्या आपला मानस आहे असें म्हणाले. परंतु "मनसा चिंतितं कार्यं दैवेनान्यत्र नीयते" या म्हणीप्रमाणें, या संशोधक कामीं लक्ष घालणारे बापूसाहेब दुर्दैवानें लवकरच दिवंगत झाले, व त्यांच्या पूर्वीच थोडे दिवस बाबासाहेब तर्खडही कालवश झाले. त्यामुळें मी अत्यंत निरुत्साही झालों; पण

आपल्याला जितकें होईल तितकें आपण करावें अशी जोराची स्फूर्ति मनाला मिळाली. असो—

बापूसाहेबांच्या वरील लिहिण्याला त्यांनींच वर पंढरपूर केंद्र धरून जें षट्दल चक्र निर्दिष्ट केलें आहे, त्या षट्दलांच्या किंवा सहा पाकळ्यांच्या विविक्षित भूभागाच्या बैठकीवरून व शिरडी हें प्राचीन कालांतील द्वारका क्षेत्र असावें या म्हणण्याला बळकटी येते. या षट्दल चक्रांतील सहा स्थानांची, पंढरपूर केंद्रस्थानाभोंवती, भौगोलिक रचना खालीं दाखविल्याप्रमाणें आहे.

श्री हरिविजयकर्ते 'श्री. श्रीधर यांनीं हरिविजयांत दक्षिण द्वारकेसंबंधानें लिहून ठेविलें आहे, त्यावरूनही नानांच्या वचनाला व बापूसाहेबांच्या म्हणण्यास पुष्टी मिळते.

श्रीपांडुरंगानें प्रत्यक्ष माझ्या कानांत जें सांगितलें, तेंच मी हरिविजयांत लिहिलें आहे. असें श्रीधर अध्यायाच्या शेवटी लिहितात.

पद्मपुराणीं पांडुरंग महात्म्य । येथें ही कथा आहे उत्तम ॥
श्रोतीं परिसिजे सप्रेम । अत्यादरें करुनियां ॥ १५६ ॥
मग मथुरेसी जातां हृषीकेशी । वियोग न सहवे राधेसी ॥
गुप्त होऊनी हिमाचळाशी । मागुती तपासी ते गेले ॥ १६४ ॥
मग तें दिव्य तप करुनी । तेच आली द्वारके लागुनी ॥
श्रीकृष्णें राधेसी देखूनी । आलिंगूनी अंकीं बैसविली ॥ १६५ ॥
अद्यापि द्वारकेसी जाण । श्रोतीं पहावें जाऊन ॥
होतें राधाकृष्ण पूजन । सर्वजन देखती तें ॥ १६६ ॥
असो अर्धांगी राधा घेऊनी । बैसली असतां चक्रपाणी ॥
तेथें आली रुक्मिणी । हरी चरण पहावया ॥ १६७ ॥
जरी सोळा सहस्र गोपिका असती । सत्यभामादि सकळ युवती ॥
परी त्याही, येतां रुक्मिणी सती । न बैसती हरी अंकीं ॥ १६८ ॥
असो रुक्मिणी आली जों एकदां । तों हरीचे अर्धांगीं बैसली राधा ॥
न धरी रुक्मिणीची मर्यादा । चढली कोपा भीमकी ॥ १७१ ॥
पुढील भविष्य जाणूनी । तात्काळ रुक्मिणी गेली रुसोनी ॥
**दक्षिण दिंडीरवनीं** येऊनी । तप करीत बैसली ॥ १७२ ॥
मग रुक्मिणी कारणें कृष्णनाथ । सर्व ऊर्वी मंडळ शोधीत ॥
तो गोकुळासी आला त्वरित । बाळवेष धरी तेव्हां ॥ १७६ ॥
सवे गाई गोपाळ घेऊनी । दक्षिण दिशे आला चक्रपाणी ॥
शोधीत वनी उपवनीं । ते रुक्मिणी चित्कळा ॥ १७७ ॥
शोधीत शोधीत हृषीकेशी । आला **लोहदंड त्रेतासी** ॥
**दिंडीरवन म्हणती त्यासी** । ते द्वारकावासी प्रवेशला ॥ १८० ॥
म्हणे प्रिये तुजवांचून । मज युगासम वाटे क्षण ॥
मग रुक्मिणी बोले वचन । तूं कोण आहेस सांग पा ॥ १८४ ॥

ऐकोनी भीमकेचे वचन। हास्य करीत मधुसूदन ॥
मग हृदयीं दृढ आलिंगून। केलें समाधान तियेचें ॥ १८७ ॥
तो पुढें **पुंडलिक भक्त**। माता पितयांची सेवा करीत ॥
तेणें तोषला जगन्नाथ। जाऊन तेथें उभा ठाके ॥ १८८ ॥
हरि म्हणे धन्य धन्य **पुंडलिका**[1]। वर मागें भक्त टिळका ॥
येरे **वीट**[2] टाकिली वैकुंठनायका। बैसावया कारणें ॥ १८९ ॥
त्या विटेवरी पद जोडूनी। दोन्ही कर कटीं ठेवुनी ॥
उभा राहिला मोक्षदानी। पुंडलिकास न्याहाळीत ॥ १९० ॥
पुंडलिका वर माग येच क्षणीं। येरु म्हणे जैसा आहेस चक्रपाणी ॥
तैसा चिरकाल ये स्थानीं। उभा राहे भगवंता ॥ १९२ ॥
**आणि या क्षेत्राचें नांव पंढरीनगर**[3] **। दक्षिण द्वारका नाम साचार ॥**
रुक्मिणी सहीत तूं सर्वेश्वर। राहें स्थिर येथेंच ॥ १९४ ॥
विठ्ठल[4] नाम अभिधान। चालवावें आतां येथून ॥
मज कोठें न जावें सोडून। कृपाळू वा सर्वेशा ॥ १९५ ॥
**म्हणून दक्षिण द्वारका पंढरी। जे विख्यात भूमंडळावरी ॥**
**सकळ द्वारकेची संपदा**[5] **मुरारी। आणीत तेव्हां पंढरी ये ॥ १९६ ॥**
जें जें विठ्ठलें कर्णीं सांगितलें। तें तें पत्रीं येथें लिहिलें ॥

---

१ पुंडलिक हा शब्द पुंडरीक या संस्कृत शब्दापासून आला असावा. पुंडरीक म्हणजे पांढरें कमळ. पांढऱ्या कमलाप्रमाणें स्वच्छ उज्वल व नाजुक भक्ति आहे ज्याची तो पुंडलीक.

२ वीट हा शब्द संस्कृत शब्द " इष्टका " पासून झाला आहे. या विटेचें या संशोधन कार्यांत अत्यंत महत्त्व आहे. तें पुढें दिसून येईल.

३ पुंडलिकाकरितां जो देव ( द्वारका सोडून ) धांवत आला तो पांडुरंग किंवा मातापित्याच्या सेवेंत अंतर न पडतां द्वारकाधीश येथें कधीं भेटेल अशी रात्रंदिवस तळमळ लागल्यामुळें पांडु वदन झालेला पुंडलिक त्यास दर्शन व वर देऊन रंजविणारा तो पांडुरंग व त्या पांडुरंगाची जी नगरी ती पांढरी किंवा त्याचें जें नगर किंवा पूर तें पंढरपूर.

४ विगतं स्थलं यस्य सः विठ्ठलः म्हणजे ज्यानें आपलें पूर्वीचें स्थल सोडून दिलें आहे; किंवा ज्याला त्या स्थलाचा वियोग झाला आहे तो विठ्ठल किंवा विटेवर ( इष्टकेवर ) जो स्थिर तो विठ्ठल किंवा वीट ( इष्टका ) हेंच आहे स्थल ज्याचें तो विठ्ठल–पांडुरंग म्ह. उग्र तपामुळें व असह्य विरहामुळें जिच्या मुखावरील रुक्म म्ह. तेज जाऊन त्यावर पांडुरता आली आहे अशा पांडुवदना रुक्मिणीला रंजविणारा तो पांडुरंग.

५ सोळा सहस्र स्त्रिया ( राधाखेरीज, ) गोपी, गोपाळ गाई आदि करून सर्व संपत्ति ( पंढरी महात्म्य पहा )

न्यून अथवा आगळें । त्याचें तोच जाणें ॥ २१३ ॥
दशम आणि हरिवंश । पद्मपुराणींच्या कथा विशेष ॥
त्याच हरीविजयीं सुरस । श्रोतीं सावकाश परिसावें ॥ २१४ ॥

हरिविजय अ. ३६.

नातुडे जो कवणेपरि । उभा केला विटेवरी ॥ १ ॥
भलाभला **पुंडलिका** । मानलासी जनलोकां ॥ २ ॥
कोण्या काळें सुखा । ऐसा कोण पावता ॥ ३ ॥
**अवघा आणिला परिवार । गोपी गोपाळांचा भार ॥ ४ ॥**
तुका म्हणे धन्य झालें । **भुमीं वैकुंठ आणिलें ॥** ५ ॥ **२३४४**
**द्वारकेचें केणें आलें याचि ठाया ।** पुढें भक्तराया चौजवीत ॥ १ ॥ २३७७
कां रे पुंड्या मातलासी । उभे केलें विठ्ठलासी ॥ १ ॥
ऐसा कैसा रे तूं धीट । **मागे भिरकाविली वीट ॥ २ ॥**
**युगें झालीं अठ्ठावीस** । अजुनी न म्हणवी बैस ॥ ३ ॥
भाव देखोनी निकट । **देवें सोडिलें वैकुंठ** ॥ ४ ॥ **२३४६**
पुंडलीक भक्तराज । तेणें साधियेलें काज ॥
**वैकुंठीचें निज । परब्रह्म आणिलें** ॥ १ ॥
**पांडुरंग बालमूर्ती । गाई गोपालां संगती** ॥
येऊनीया प्रीती ! उभे समचि राहिले ॥ २ ॥ २३४७
**वैकुंठीचा देव आणिला भूतळा ।** धन्य तो आगळा पुंडलिक ॥ १ ॥
धरिष्ट धैर्याचा वरिष्ट भक्तांचा । पवित्र पुण्याचा एकनिष्ट ॥ २ ॥
**पितृसेवा पुण्यें** लाभला निधान । ब्रह्म सनातन अंगसंगें ॥ ३ ॥
अंगसंगें 'रंगे क्रीडा करी जाणा । ज्या घरीं पाहूणा वैकुंठीचा ॥ ४ ॥ २३४९

श्रीतुकारामाची गाथा (पणशीकरशास्त्री यांनीं तपासून निर्णयसागर छापखान्यांत छापलेल्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रतीवरून)

वरील उतारा श्रीतुकाराम महाराजांच्या गाथ्यावरून घेतला आहे. त्यांत ही अठ्ठावीस युगांपूर्वी वैकुंठीचा देव म्हणजे द्वारकेचे श्रीकृष्ण परमात्मा, पुंडलिकानें मातृ-पितृ सेवा पुण्याईनें पंढरपुरास आणले असें आहे. यावरूनही नानांच्या वजनाला चांगली पुष्टी मिळते.

श्रीहरिविजयांत (अ. ३२) नारदांची नारदी झाली यासंबंधीं जी सुरस कथा वर्णिली आहे, तीहि वरील अनुमानाला पोषकच आहे. ती कथा खालीं लिहिल्याप्रमाणें:—

" यावरी एके दिवशीं नारदमुनी । स्नान करीत **सुरनदी**[1] जीवनीं ॥
तों मत्स्य आणि मत्स्यिणी । रमतां दृष्टी देखिली ॥ १३ ॥

[ १ " गंगा विष्णु पदीजन्हतनया सुरनिम्नगा भागिरथी त्रिपथगा त्रिस्रोता भीष्मसूरपि "—अमर कोश प्रथम कांड वारि वर्ग श्लो. २८६.

२ अयोध्या मथुरा माया ( हरिद्वार ) काशीकांची अवंतिका । पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायका. ]

काय संसार स्त्रीवीण । नाहीं देखिलें पुत्रवदन ॥
आतां विवाह करावा येथून । तरी स्त्री वाढेल कधी ॥ १४ ॥
तरी आतां घेऊं **कृष्णदर्शन** । सोळा सहस्त्र रमा त्या लागून ॥
एक घ्यावी आतां मागून । करुं संतानवृद्धी कांहीं ॥ १५ ॥
विसरला जपतप अनुष्ठान । जवळीं घेतला कमंडलु जीवन ॥
हातीं ब्रह्मवीणा घेऊन । **मुक्तपुरीस** पावला ॥ १६ ॥
जे अनंत शक्तींची स्वामिनी । ते आदीमाया मन्मथजननी ॥
तिये मंदिरीं शार्ङ्गपाणी । बैसला होता तेधवां ॥ १७ ॥
तेथेंचि आला नारदमुनि । तों दृष्टी देखिला मोक्षदानी ॥
हातीं चामर घेऊनी । **नारी रुक्मिणी** वारीतसे ॥ १८ ॥
हरि म्हणे जलजोद्भववंदना । कांहीं मज करावी आज्ञा ॥
आजि स्वामींची वासना । परम चंचल दिसतसे ॥ २० ॥
नारद म्हणे घननीळा । व्यर्थ आमुचा काळ गेला ॥
गृहस्थाश्रम नाहीं केला । पुत्र कलत्र न देखो ॥ २१ ॥
तरी तुज बहुत स्त्रिया जगन्मोहना । मज एक देईं अंगना ॥
स्त्रीदान करी त्याच्या पुण्या । पार नाहीं सर्वथा ॥ २२ ॥
म्हणे जे गृहीं मी नसे ब्रह्मनंदना । तेथून अवश्य घ्यावी ललना ॥
बरे म्हणोनि ते क्षणां । सांवरोनि वीणा उठिला ॥ २४ ॥
गेला दुसरिया गृहाप्रती । तों तेथें बैसलासे जगत्पती ॥
उद्धव अक्रुर उभे असती । विंझणें हातीं घेऊनियां ॥ २५ ॥
कोठें आचरें कर्मकांड । कोठें उपासना दावी प्रचंड ॥
कोठें ज्ञान कथी वितंड । परम मूढां जीवासी ॥ ४० ॥
ऐसा जे गृहीं रिघे नारद । तिकडे व्यापलासे गोविंद ॥
म्हणे विश्वव्यापका ब्रह्मानंद । रिता ठाव न दिसेचि ॥ ४१ ॥
**मग तैसाच वेगें निघाला । भागीरथी तीरास आला ॥**
**अनुतापें तप्त झाला । स्नानासि चालिला ब्रह्मपुत्र ॥ ४२ ॥**
**जळीं करितां अघमर्षण । तों मायेनें दाविलें विंदाण ॥**
**स्त्रीचें रुप आपण । नारद जाहला तेधवां ॥ ४४ ॥**
**रंभे ऐसें रुप सुंदर । नारदी झाला मुनीश्वर ।**
**तेथें एक पुरुष आला साचार । कामातुर होऊनियां ॥ ४५ ॥**
**तेणें संग देतांचि तात्काळ । गरोदर झाली वेल्हाळ ॥**
**नवमास भरतां समूळ । प्रसूत झाली तेधवां ॥ ४६ ॥**
**तात्काळ झाले साठी पुत्र । प्रभव विभवादी संवत्सर ॥**
नारद मुनी करी विचार । म्हणे अनर्थ थोर जाहला ॥ ४७ ॥

मज लागलें स्त्रियेचें ध्यान । तेंच मी जाहलों न लागतां क्षण ॥
मग करीत हरिस्मरण । सोडवी येथून दयाळुवा ॥ ४८ ॥
करितांचि कृष्ण चिंतन । पूर्ववत झाला ब्रह्मनंदन ॥
बाहेर आला स्नान करून । मग तप दारुण आचरला ॥ ४९ ॥

वरील उताऱ्यावरून नारदांची नारदी झाली, व तिला साठ पुत्र झाले असें दिसतें. पण ही गोष्ट घडली कोठें ? द्वारकेजवळ असें सकृद्दर्शनीं दिसतें. पण कोणत्या द्वारकेजवळ ? पश्चिम द्वारकेजवळ किंवा दक्षिण द्वारकेजवळ ? रुक्मिणी मातुःश्री रुसून द्वारका सोडून दिंडीरवनांत ( पंढरीस आल्यानंतर किंवा त्यापूर्वी त्या पश्चिम द्वारकेंत असतांना ? नारदांनीं सुरनदींत स्नान केलें. नंतर अनुताप पावून भागीरथी तीरावर येऊन स्नान केलें. ही सुरनदी व भागीरथी म्हणजे पश्चिम द्वारकेला असलेली गोमती गंगा किंवा दक्षिण द्वारकेस असलेली चंद्रभागा ( भीमा ) किंवा शिरडीजवळ असलेली वृद्धगंगा गोदावरी ? रुक्मिणी मातुःश्री रुसून ज्या एकदां दिंडीरवनास गेल्या, त्या पुन्हां परत आल्या नाहींत, व त्यांच्या भेटीकरतां श्रीकृष्ण पश्चिम द्वारका सोडून त्यांच्या शोधार्थ जे दिंडीरवनास गेले ते त्यांना भेटून व भक्त मुगुटमणी पुंडलिक यांना दर्शन देऊन त्यांना वर दिल्याप्रमाणें त्यांच्या विनंतीला मान देऊन दक्षिण द्वारका जी पंढरी तेथेंच विटेवर आज अठ्ठावीस युगें रुक्मिणी माईसह व द्वारकेच्या सर्व संपत्तीसह उमे आहेत. ते पुन्हां पश्चिम द्वारकेला गेले नाहींत. हरिविजयाच्या ३६ व्या अध्यायांतील वर जो उतारा दिला आहे, त्यांतील १९६ व्या ओवींत श्रीकृष्णांनीं द्वारकेची सर्व संपत्ति पंढरींत आणली असें आहे. तसेंच श्रीसमर्थ तुकोबारायांनीं आपल्या गाथ्यांतील २३४४ व २३४७ व्या अभंगांतहि तेंच लिहिलें आहे. सर्व संपत्ति याचा अर्थ सर्व वैभव, सर्व ऐश्वर्य असा घेतला म्हणजे त्यांत सोळा सहस्र एकशें आठ स्त्रियांचाहि समावेश होतो. कारण इतक्या स्त्रिया असणें ही एक उत्तम प्रकारची संपत्ति व ऐश्वर्य आहे. पण अशा प्रकारचा स्त्रियांचा स्पष्ट उल्लेख हरिविजयांत नाहीं. श्री तुकोबारायांच्या गाथ्यांत गाई गोपाळांसह व अवघ्या परिवारासह परमात्मा पंढरीला आले असें लिहिलें आहे.

अवघा परिवार व सर्व संपत्ति या दोन शब्दांत सोळा सहस्र स्त्रियांचाही समावेश झालाच पाहिजे असें मला वाटतें (श्रीपंढरी महात्मांत सोळा सहस्र स्त्रियांचा उल्लेख आहे.) शिवाय वरील हरिविजयांतील १६६ व्या ओवींत अद्याप पावेतों पश्चिम द्वारकेंत राधाकृष्णाचेंच पूजन होतें असें लिहिलें आहे. यावरून ज्या, अंकीं बसलेल्या राधामाईच्या अनुत्थापनामुळें रुक्मिणीमाता रुसून दिंडीरवनांत तपाचरणास गेल्या, त्या दोघींची समजूत करण्याकरितां कृष्णपरमात्माच्या शिल्लक राहिलेल्या ऐश्वर्याचा स्वतंत्र उपयोग एकट्या मानिनी राधेनें पश्चिम द्वारकेंत घ्यावा व रुष्ट झालेल्या रुक्मिणीमातांनीं इतर स्त्रियांच्या व गाई गोपाळांच्या लवाजम्यासह वर्तमान परमात्म्याच्या सर्व संपत्तीचा स्वतंत्र उपभोग दक्षिण द्वारकेंत घ्यावा अशी गोड व सुंदर युक्ति काढिली असणें बव्हंशीं संभवनीय दिसतें, व या अनुमानाच्या पुष्टीकरणार्थ नारदांची नारदी दिंडीरवनांत वृद्ध-

गंगेच्या म्हणजे सुरदनी किंवा भागीरथीच्या म्हणजे गोदावरीच्या तीरावरच झाली असावी असा गोदावरी व सिंहस्थ महात्म, आख्यायिका, व निसर्ग यांचा शिरडी बाजूकडेच सबळ पुरावा मिळतो.

गोदावरी व सिंहस्थ महात्मांत असें वर्णन आहे कीं, अति अति प्राचीन काळीं या भूतलावर कोणतीहि नदी नव्हती. श्रीशंकरांनीं त्रैलोक्यांतील सर्व जलाचें सार व शक्ति काढून आपल्या कमंडलूंत भरून ठेविली. त्याला आपो-देवता म्हणत. ब्रह्मदेवाच्या पातकाचा क्षय होण्याकरितां शंकरांनीं तो कमंडलु ब्रह्मदेवास दिला. बलिराजाकडून मागितलेल्या त्रिपाद भूमीपैकीं तिसरें पद कोठें ठेवावें अशी विवंचना वामनमूर्ति परमात्म्यास पडतांच ब्रह्मदेवानें तो आपोदेवता स्थित कमंडलु पुढें केला. त्यावर परमात्मानीं पद ठेवतांच ते पाणी उसळून मेरुपर्वतावर पडलें, व तेथून जमिनीवर चारी दिशांना वाहूं लागलें. त्यापैकीं दक्षिण दिशेचें पाणी शंकरांनीं आपल्या जटेंत ठेविलें. पुढें श्रीगौतमांनीं गोहत्त्येच्या पातकापासून आपण स्वतः मुक्त होण्याकरतां व भगिरथांनीं आपलें पितर मुक्त होण्यासाठीं जटेंतील आपोदेवता आपणांस मिळाव्या म्हणून शंकराची आराधना केली. शंकरांनीं प्रसन्न होऊन दोघांसही तें पाणी दिलें. त्याप्रमाणें त्या पाण्याचे दोन विभाग होऊन तें पाणी मर्त्य लोकांवर आलें, तेव्हांपासून "एवं द्वौरूप्यम भवद्गंगा या गांगता यतः।" ती आपोदेवता पृथ्वीवर गेली. (गां-पृथ्वी, गति-गेली) म्हणून तिला गंगा हें नांव प्राप्त झालें. नंतर माझें कार्य झालें, मी स्वर्गांत जातें, असें गंगामाई गौतमास म्हणाल्या. त्रैलोक्यावर उपकार करण्याकरितां तुला येथेंच राहिलें पाहिजे असें गौतमांनीं तिला सांगितलें. तिला तें म्हणणें पटलें. नंतर तिनें आपल्या शरीराचे १५ तुकडे करून त्यांपैकीं ४ स्वर्गांत, ४ पाताळांत व ७ मृत्युलोकावर ठेविले. विंध्याचलाच्या दक्षिणेस जे सहा मोठे सरित्प्रवाह आहेत ते याच सप्तविभागांपैकीं आहेत, व ते प्रवाह म्हणजे गोदावरी, भीमरथी, तुंगभद्र, वेणिका (वेण्या) तापी व पयोष्णि हे होत. भगीरथानें त्याच वेळीं शंकर जटेंतील जलाचा जो भाग आणिला तो त्यानें उत्तरेस हिमाचलावर ठेवला. त्याचेही असेच मोठेमोठे सहा सरित्प्रवाह झाले, व ते प्रवाह म्हणजे भागीरथी, यमुना, सरस्वती, नर्मदा, विशोका, व वितस्ता हे होत.

यावरून गोदावरी ही मृत्युलोकावर सर्वांत आद्य व श्रेष्ठ नदी आहे. गंगेलाच भागीरथी व सुरनदी हीं नावें आहेत " गंगा विष्णुपदी जन्हुतनया सुरनिम्नगा । भागीरथी त्रिपथगा त्रिस्रोता भीष्मसूरपि " इत्यमरः प्रथमकांड, वारिवर्ग २८६.

त्याचप्रमाणें चंद्रभागा, भीमरथी, भीमा हा गोदावरीचाच प्रवाह होय. गोदावरीस वृद्धगंगा किंवा गंगेची ज्येष्ठ भगिनी असें म्हणतात.

(वरील गोदावरीच्या १२ प्रवाहांत पश्चिम द्वारकेंत असलेल्या गोमती गंगेचा नामनिर्देश नाहीं.)

यावरून नारदांची नारदी ज्या सुरनदींत किंवा भागीरथींत झाली, ती कोणती सुरनदी किंवा भागीरथी)? म्हणजे पश्चिम द्वारकेजवळील गोमती गंगा किंवा हरिद्वारची

गंगा किंवा श्रीक्षेत्र वाराणसी जवळील भागीरथी किंवा पंढरपुराजवळील भीमरथी चंद्रभागा किंवा शिरडीजवळ असलेल्या संवत्सर क्षेत्रास लागून असलेली गोदावरी आद्य सुरनदी ?

पण नारद सुरनदींत स्नान करून कामातूर होऊन कृष्णपरमात्माच्या सोळाहजार स्त्रियांपैकीं एक मागावयास गेले तें ठिकाण दोहोंपैकीं एक असणार. एक पश्चिम द्वारका किंवा दक्षिण द्वारका दिंडिरवन, पंढरपूर, शिरडी वगैरे वगैरे. कारण याच दोन ठिकाणीं त्यांचा अवाढव्य स्त्री परिवार असणार. इतरत्र नाहीं.

श्रीसाईपद दासानुदास

अपूर्ण **कै. बा. वि. देव**

बाबांचें बाळ.

श्री. संपादक महाशय यांसः—

श्रीसाईबद्दल दोन शब्दरूपी "गुरुप्रार्थना" आपलेकडे पाठवीत आहें. त्यास आपण येत्या अंकांत जागा द्यावी, कळावें

**वि. स. सामंत**

## "श्रीसाई प्रार्थना"

१

ध्यावुं मनीं गुरु सदाऽऽजीविंचा विसावा ॥
वंदुया तयांच्या सौख्यदा पदांला ॥ धृ० ॥
ध्याति तूंसि भक्त सदा ।
हरीशि त्यांच्या आपदा ॥
तव उदी देई बुद्धि । नाम हरिशड्रिपु गदा ॥ १ ॥
दास विष्णु विनवी तुला । शिरडी मार्ग दावि मला ।
भवसागर तरावया । पथ दावि तूं आम्हां ॥ २ ॥

(२)

पडतां जडभारीं दासीं आठवावा हरी ।
मग तो कृपा सिंधू निवारी सांकडें ॥
येर ते बापुडे काय रंकः संताची वाणी आहे.

पूर्वी द्वापार व त्रेतायुगांत मनुष्यास ईश्वराची प्राप्ती किंवा त्याची कृपा मिळविण्याची असल्यास त्यावेळीं त्यांना बारा वर्षांपासून तों हजार हजार वर्षेपर्यंत खडतर तपःश्चर्या करावी लागत होती असें म्हणतात.

परंतु सध्याच्या या कलियुगांत मनुष्याचा (भाव) भक्ती दृढ होऊन जर त्या साई परमेश्वराची दिवसांतून एक अर्धा तास त्यांची सावळी मूर्ति मनांत आणून एक चित्तानें त्यांची प्रार्थना करण्याची संवयी लावून घेतल्यास अशा भक्तांना सन्मार्गाच्या मार्गावर लावून त्यांच्या मनांतील ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण करण्याचें

आपलें ब्रिद सार्थ करून दाखवितील अशी माझी पूर्ण खात्री आहे. मी वरील अनुभव उपभोगलेला आहे. तरी मानवांनों याहून आपणांस दुसऱ्या कशाची जरूरी आहे ?

मात्र तुम्हीं तुमच्या ( निंदक, व शत्रूरुपी घाण ) आजूबाजूच्या घाणीकडे लक्ष न देतां न डगमगतां व न कंटाळतां त्या साईमाऊलीचें रूप तुमच्या मनांत अहर्निश ठेवून एकाग्रतेनें त्यांना नमस्कार करा व मग पहा नामाचा महिमा. बोला- जय जय श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय.

**विष्णु सदाशिव सामंत**
कापूरबावडी, ठाणें.

---

# -: शिर्डीवृत्त :-

माहेः— **फेब्रुवारी, मार्च, एप्रिल.**

भक्तांची ये जा नेहमींप्रमाणें चालू होती. एप्रिलमध्यें श्री रामनवमी उत्सव असल्यानें शिरडीला यंदा भक्तमंडळाची फारच गर्दी झाली होती.

धर्मकृत्यः—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजाआरती महानैवद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन वगैरे धर्मकृत्यें नेहमींप्रमाणें पार पडलीं, व भक्तांच्या इच्छेनुसार सत्यनारायणाच्या पूजाही घालण्यांत आल्या. संस्थान गवई यांचीं प्रत्येक एकादशीस कीर्तनें झालीं. बाहेर गांवचे कीर्तनकार ह. भ. प. दिगंबरबुवा देशपांडे, श्री. उद्धव नथु जोशी, ह. भ. प. नागेशबुवा पंढरपूरकर, ह. भ. प. तुकारामबुवा आजगांवकर, ह. भ. प. अनंतबुवा आठवले, ह. भ. प. वासुदेवबुवा कोकले-गांवकर यांचीं कीर्तनें समाधी मंदिरांत झालीं.

नवलविशेषः— श्रीसमाधी मंदिरांतील ऑईलपेंटचें काम पूर्ण झालें असून त्यामुळें मंदिरास विशेष शोभा येत आहे.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

---

# -श्रीरामनवमी उत्सव-

सालाबादप्रमाणें श्री रामनवमी उत्सव शिर्डी येथें चैत्र शु. ९ शके १८७१ गुरुवार ता. ७ एप्रिल १९४९ रोजीं श्री समाधी मंदिरांत उत्तम प्रकारें साजरा करण्यांत आला. उत्सवास प्रारंभ चैत्र शु. ८ ता. ६।४।४९ बुधवार रोजीं झाला. या दिवशीं नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त दोनप्रहरीं ह. भ. प. तुकारामबुवा आजगांवकर यांचें कीर्तन, रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक असे कार्यक्रम झाले. गुरुवार ता. ७।४।४९ रोजीं पहाटे श्रींचें समाधीस भक्तांच्या अभिषेक, अर्चन पूजा वगैरे झाल्यानंतर सकाळीं ७ ते ८ पर्यंत कावडी मिरवणूक व कावडीपूजन होऊन श्रींचे समाधीस स्नान घालण्यांत

आले. श्रींचे समाधीस मंगलस्नान, पूष्पार्पण, वस्त्रार्पण, होईपर्यंत ११ वाजले. नंतर समाधी-मंदिरापुढें उभारलेल्या भव्य मंडपांत ह. भ. प. अनंतबुवा आठवले यांचे रामजन्मोत्सव कीर्तन झालें. नंतर मध्यान आरती होऊन तीर्थप्रसाद वाटण्यांत आला. सायंकाळीं निशाणांची व श्रींचे रथाची मिरवणूक होऊन रात्रौ शोभेची दारु उडविण्यांत आली. नंतर मुंबईचे रेडियोस्टार श्री. दिक्षीत व श्री. नाडकर्णी यांचा गायनाचा कार्यक्रम झाला. व इतर भक्तांच्या संगीत गायन–भजनांच्या हजेऱ्या झाल्या. नगरजिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीस्वामी सहजानंद यांचें प्रवचन झालें. ता. ८।४।४९ शुक्रवार रोजीं सकाळीं १०–१२ पर्यंत काला कीर्तन होऊन उत्सव समाप्त झाला. सर्व कार्यक्रमास लाऊड स्पीकरची सोय करण्यांत आली होती.

यंदा रामनवमी उत्सवास फारच गर्दी झाली होती.

**सेक्रेटरी**
शिरडी संस्थान कमिटी.

---

# श्री साईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावें म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते संपादकाकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्या-बद्दल आक्षरपूर्वक योग्य तो विचार होईल.

## लेखकांकरितां

( १ ) श्री साईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख. अथवा कविता ( सांई-विषयींच असाव्यात ). कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पिन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

( २ ) लिखाणा सोबत पूर्ण नांव पत्ता दिला पाहिजे नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्ध द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें,

( ३ ) लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर एक महिन्यांत पसंती अगर नाप-संती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

( ४ ) लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्ही घेत नाहीं.

( ५ ) लेखासोबत, पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

( ६ ) लेखकाला तो साईलीला त्रैमासिकाचा वर्गणीदार नसल्यास, लेख अगर कविता वगैरे लीलेंत प्रसिद्ध करूं, पण अंक पाठविला जाणार नाहीं.

---

# वर्गणीदारांकरितां

१ श्री साईलीलेचा वार्षारंभ जानेवारी महिन्याच्या अंकापासून आहे. वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच संपादकास कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात. अगर परत येतात.

३ अंकांसंबंधीं पत्रव्यवहार संपादकाकडे करावा. अंकावर र. न. घातलेला आहे तो लिहावा.

४ 'श्री साईलीला' हें त्रैमासिक आहे.

५ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह रु. २ आ. ४ आहे. वर्गणी म्यानेजर शिरडी संस्थान, मुक्काम शिरडी, पोष्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर या पत्त्यावर पाठवावी व वर्गणी कशाकरितां पाठविली आहे तें स्पष्ट लिहावें.

६ अंक व्ही. पी. ने पाठविला जाणार नाहीं.

**संपादक**

---

# ईश्वरभक्ति कां करावी व कशी करावी ?

ईश्वरच आपल्या कर्मांचा प्रेरक असल्यामुळें आपल्याला सुबुद्धि व्हावी म्हणून ईश्वरभक्ति केली पाहिजे. ईश्वर हा निर्गुण निराकार अव्यक्त आहे, आणि आपले मनचा ओढा नैसर्गिक व्यक्त विषयांकडे आहे. म्हणून नामस्मरण, भजन पूजन, गायन करणें श्रेष्ठ होय, व हीच ईश्वरभक्ति होय. मन जसें विषयांत रमतें तसें जर तें ईश्वराचे ( प्रतिक अगर मूर्ति ) ठिकाणीं रममाण होऊं लागलें तर तीच प्रपंचांतील खरी भक्ति होय.

याप्रमाणें मन आपल्या मनोमय मूर्तींच्या ठिकाणीं एकाग्र झालें तर पुढें सद्गुरु भेटून आत्मज्ञानाचा उपदेश होईल व अक्षय सुख लागेल. मनाला एकाग्रता साधावी म्हणून ईश्वरभक्तीचा हेतु आहे. परंतु भोळे अगर महाविद्वानांना ( अहंपणानें ) हा हेतु न समजल्यामुळें ईश्वरभक्ति म्हणजे ईश्वराला नुसतें फुलें वाहाणें किंवा पोपटासारखें नामस्मरणाचें महत्व सांगणें हीच ईश्वरभक्ति समजतात. पण असें जन्मभर करीत राहिलांत तरी त्यापासून यत्किंचित् सुद्धां फायदा होणार नाहीं.

ईश्वरभक्ति सुरू केली म्हणजे मन स्वच्छ होऊं लागतें. मन स्वच्छ झालें कीं, ध्यान साधूं लागतें, ध्यान साधूं लागलें तर मन एकाग्र होतें व मन एकाग्र होऊं लागलें तर बुद्धि सम होते; व समबुद्धीनें कर्म करितां येऊं लागलें तर भक्तीचें खरें फळ मिळालें म्हणून समजावें. परंतु ह्या साध्या गोष्टी नाहींत. त्याला परिश्रम करावे लागतात. शिवाय, नियमित आहार, नियमित विहार, नियमित झोंप, कोणाला पिडा न करणें, न्यायनीतीनें वागणें, परस्त्री मातेसमान मानणें, इंद्रियनिग्रह करणें, सत्यानें वागणें व धर्मानें चालणें इत्यादि पथ्यें पाळावीं लागतात. तर ईश्वराकडे लक्ष्य लावणें ही खरी भक्ति साधेल. कित्येक लोकांना हें भक्तीचें वर्म समजत नाहीं म्हणून ते नुसते नामस्मरण तर नामस्मरण करीत बसतात, कित्येक पूजार्चनांत आपला वेळ खर्च करतात; तर पुष्कळसे लोक पोथ्या पुराणें अगर विष्णुसहस्त्रनामासारखें स्तोत्रच सारा दिवस पठण करीत बसतात. कोणी सप्ताह करीत बसतात. त्या बरोबर इतर व्रतें नियम ते पाळीत नाहींत. त्यामुळें ईश्वरभक्तीचें खरें फल त्यांना मिळत नाहीं, उलट, अशा एकांगी भक्तीनें कोणी रागीट, कोणी तिरसट, संतापी, अतिलोभी अशासारखे त्यांचे स्वभाव बनतात.

भक्तीचा हेतु ईश्वराशीं ऐक्य पावण्याचा आहे. हें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून जी वर्तणूक त्याला पोषक होईल असेंच आपल्या व्यवहारांतील वर्तन ठेवावें.

—संपादक